७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. २९ मार्च २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०९३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## अजित पवारांच्या अपघाती मृत्यूला २ महिने पूर्ण

मुंबई (दै. संध्या) : अजित पवार यांच्या अपघाती निधनाला आज 2 महिने पूर्ण झाले. राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना आज त्यांची आठवण दाटून आली. त्यांनी आपल्या भावना एका पोस्टद्वारे व्यक्त केल्या आहेत. आज तुम्हाला जाऊन 2 महिने पूर्ण झाले. काळ पुढे सरकतोय, पण मन अजूनही तुमच्याच आठवणींमध्ये गुंतून राहिले आहे, असे त्यांनी म्हटले आहे. अजित पवार यांचे गत 28 जानेवारी रोजी झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. अजित पवारांच्या खासगी विमानाने त्या दिवशी सकाळी पावणे 9 च्या सुमारास बारामती विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला. त्यानंतर वैमानिकाने दुसऱ्या प्रयत्नांत पुन्हा विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न केला. पण यावेळी विमान धावपट्टीपासून काही अंतरावर खोल खड्डयात कोसळले. त्यात अजित पवारासंह 5 जण ठार झाले. या दुर्घटनेला आज 2 महिने पूर्ण झाले. पण या दुर्घटनेचा तपास व त्यावरील राजकारण अद्याप संपले नाही.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## खरात प्रकरणात दोन्ही 'राष्ट्रवादी' समोरासमोर

मुंबई (दै. संध्या) : भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाने आता राजकीय वळण घेतले असून, राज्यातील दोन्ही राष्ट्रवादी गट या मुद्द्यावरून एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी रुपाली चाकणकर आणि सुनील तटकरे यांना सहआरोपी करण्याची मागणी केल्यानंतर, अजित पवार गटाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी जोरदार पलटवार केला आहे. आनंद परांजपे म्हणाले की, शरद पवार गटाचे युवा नेते रोहित पवार यांच्या सांगण्यावरणं विकास लवांडे यांनी हा आरोप केला नाही ना? अशी शंका मला येते. त्यावेळी जलसंपदा मंत्री जयंत पाटील हे होते. जयंत पाटील प्रदेशाध्यक्ष असताना त्यांचे अनेक फोटो आणि भेटी भोंदू अशोक खरातसोबत झाल्या आहेत. त्यात जयंत पाटील यांना सुद्धा सहआरोपी करावे अशी मंशा रोहित पवारांची आहे का? अशी भावना माझ्या मनात येते.

## भोंदू खरात गुन्हेगार अन् महत्त्वाचा साक्षीदार

मुंबई (दै. संध्या) : प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडीने भोंदू अशोक खरातच्या जिवाला पोलिस कोठडीत मोठा धोका असल्याचा संशय व्यक्त केला आहे. भोंदू अशोक खरात गुन्हेगारच नाही, तर या प्रकरणातील एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. या प्रकरणात गुंतलेले लोक पाहता त्याच्या जिवाला कोठडीत मोठा धोका आहे. त्यामुळे त्याला तात्काळ उच्च सुरक्षा कोठडीत ठेवण्याची गरज आहे, असे वंचितने म्हटले आहे. अशोक खरातवर नाशिक व परिसरातील अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. त्याच्याशी कथित संबंध असल्याच्या संशयावरून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या रुपाली चाकणकर यांना प्रथम राज्य महिला आयोग व नंतर महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. या प्रकरणी त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने अशोक खरातच्या जीवितास पोलिस कोठडीतच मोठा धोका असल्याचा संशय व्यक्त करत त्याला तात्काळ उच्च सुरक्षा कोठडीत हलवण्याची मागणी केली आहे.

## मोलकरणीकडे शरीर सुखाची मागणी

मुंबई (दै. संध्या) : विविध टीव्ही मालिकांमध्ये काम केलेल्या एका अभिनेत्याने लैंगिक सुख देण्यास नकार देणाऱ्या एका 37 वर्षीय मोलकरणीची गळा चिरून हत्या केल्याची भयंकर घटना मुंबई लगतच्या ठाणे जिल्ह्यात घडली आहे. पोलिसांनी आरोपीला विशाखापट्टणम रेल्वे स्थानकावरून अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ माजली आहे. यासंबंधीच्या वृत्तानुसार, आशिष मेश्राम असे आरोपीचे नाव आहे. तो एक टीव्ही अभिनेता आहे. त्याने काही मालिकांमध्ये कामही केले आहे. ते ठाणे जिल्ह्यातील मीरा रोड रस्त्यावरील चंद्रेश अकॉर्ड सोसायटीतील एका फ्लॅटमध्ये राहत होता. बुधवारी रात्री मृत मोलकरीण त्याच्याकडे काम करत होती. त्याने तिच्याकडे शरीर सुखाची मागणी केली.

# कदाचित ३ महिन्यांनी LPG बंद होईल

## अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळांचे मोठे विधान; PNG गॅसच्या जोडण्या वाढवण्यावर दिला भर

नवी दिल्ली (दै. संध्या)

राज्यातील विविध शहरांत स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला असताना राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी कदाचित 3 महिन्यांत एलपीजी गॅस बंद होईल असे पोटात गोळा उठवणारे विधान केले आहे. सध्या पीएनजी गॅस स्वस्त पडत आहे. त्यामुळे त्याचा अधिकाधिक वापर झाला पाहिजे. केंद्राच्या एका पत्रकात 3 महिन्यांनी कदाचित एलपीजी बंद होईल असा उल्लेख आहे. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या घेतल्या पाहिजेत, असे ते म्हणालेत. नवी दिल्लीत आज केंद्रीय शहरी विकास मंत्री मनोहरलाल खट्टर व केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या नेतृत्वात एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत निवासी व व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी व पीएनजी गॅसचा अधिक चांगला व सुलभ पुरवठा उपलब्ध करून देणे, तसेच एका निश्चित कालावधीत पीएनजी सेवांचा विस्तार करण्याच्या मुद्यावर चर्चा झाली. त्यानंतर महाराष्ट्र सदनात आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री मंत्री छगन भुजबळ यांनी




वरील विधान केले. भुजबळ म्हणाले, देशातील निवासी व व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी गॅसचा पुरवठा सुलभपणे कसा करता येईल? त्यात कोणत्या अडचणी आहेत याचा आढावा घेण्यासाठी आज दिल्लीत सर्व राज्यांच्या सचिवांना आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना बोलावण्यात आले होते. या बैठकीला केंद्रीय मंत्री हरदीप पुरी, प्रल्हाद जोशी व मनोहरलाल खट्टर उपस्थित होते. त्यांनी सर्वच राज्याचे मंत्री व सचिवांना काही सूचना केल्या. त्यानुसार, पी.एन. जी. गॅस सध्या स्वस्त पडत आहे. त्याचा जास्तीत जास्त वापर झाला पाहिजे. त्याचा जास्त प्रसार झाला पाहिजे.

केंद्र सरकारच्या एका पत्रकात कदाचित 3 महिन्यांनी एलपीजी बंद होईल असा उल्लेख होता. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या करून घेतल्या पाहिजेत. ज्या ठिकाणी यासंदर्भात काम करणे शक्य आहे, तिथे ते सुरू केले पाहिजे. सगळ्या नगरपालिकांनी पीएनजीच्या जोडण्या वाढवल्या पाहिजे. पाण्याचे व वीजेचे कनेक्शन असल्यावरच इमारतींना ओसी दिली जाते. त्याप्रमाणेच आता पीएनजी कनेक्शनच्या सक्तीची अट टाकली पाहिजे. आपल्याला पीएनजी जोडण्या लवकरात लवकर करायच्या आहेत. पाईपलाईन टाकण्यासाठी विविध विभागांना परवानग्या मागितल्या जातात. पीएनजी मिळाली असे समजावे. या परवानग्या 24 तासांत दिल्या जातील. पीएनजी काम करणाऱ्यांना 24 तास परवानगी राहील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### पेट्रोल पंपांवरही मिळणार केरोसीन

छगन भुजबळांनी यावेळी गॅस टंचाईमुळे केरोसीनचा अधिकाधिक वापर करण्यावरही भर दिला. ते म्हणाले, राज्य सरकारकडे केरोसिन उपलब्ध होते. पण आपण ते देऊ शकत नव्हतो. कारण, उच्च न्यायालयाने त्यावेळी एक आदेश दिला होता. आता आपण न्यायालयाला कळवले आहे. त्यानुसार, जिथे एलपीजी व पी.एन. जी.साठा कमी आहे, तिथे केरोसीनचा वापर करण्याची परवानगी दिली आहे. ज्या जुन्या डिलर्सच्या परवान्यांचे नुतनीकरण प्रलंबित होते, त्यांनी ते झाले असे समजून कामाला लागावे. या प्रकरणी पेट्रोल पंपावर केरोसीनचे टँकर उभे करून तेथून पुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे भुजबळ म्हणाले.

## रोहित पवारांची DGCA च्या नव्या गाईडलाईन्सवर टीका

बुलढाणा (दै. संध्या)

अजित पवारांच्या विमान अपघातानंतर डीजीसीए अर्थात नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने व्हीआयपी व्यक्तीच्या हवाई प्रवासाच्या सुरक्षेविषयी नव्या गाईडलाईन्स जाहीर केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या गाईडलाईन्सवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. डीजीसीएने व्हीएसआर कंपनीसह संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली तर नव्या गाईडलाईन्सला अर्थ आहे, अन्यथा त्या केवळ एक दिखावा ठरतील, असे त्यांनी म्हटले आहे. अजित पवार यांचे गत 28 जानेवारी रोजी बारामती येथील एका विमान अपघातात निधन झाले. तेव्हापासून



■ VSR कंपनी, अधिकाऱ्यांवर कारवाई होईपर्यंत नव्या नियमांना अर्थ नाही

रोहित पवार या प्रकरणी व्हीएसआर विमान कंपनीवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत आहेत. या अपघातानंतर डीजीसीएने महत्त्वाच्या व्यक्तीच्या विमान प्रवासाच्या सुरक्षेविषयी नवी गाईडलाईन्स जाहीर केली आहे. त्यावर रोहित पवारांनी निशाणा साधला आहे.

## मोदींच्या हस्ते नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन; एकजुटीचा संदेश

*देशातील सर्वात मोठ्या विमानतळाचा पहिला टप्पा सुरू; युद्धसंकटावर एकत्र लढण्याचे आवाहन*

मुंबई (दै. संध्या)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशातील जेवर येथे नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केले. हा विमानतळ सध्या भारतातील सर्वात मोठा आणि आशियातील दुसऱ्या क्रमांकाचा विमानतळ ठरणार असून, पूर्ण झाल्यानंतर आशियातील सर्वात मोठा विमानतळ बनेल.

पहिल्या टप्प्यात सुमारे ३३०० एकर क्षेत्रात टर्मिनल आणि धावपट्टी उभारण्यात आली असून, वार्षिक ३ कोटी प्रवाशांची क्षमता असेल. या प्रकल्पासाठी सुमारे ११ हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. विमानतळ पूर्णपणे ५२ चौरस किलोमीटर क्षेत्रात विकसित केला जाणार



आहे. उद्घाटनानंतर झालेल्या सभेत मोदींनी पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशवासियांना एकजुटीने संकटाचा सामना करण्याचे आवाहन केले. "शांतपणे, धैर्याने आणि एकजुटीने या जागतिक संकटाला सामोरे जावे," असे ते म्हणाले. मोदींनी विरोधकांवर टीका करताना सांगितले की, पूर्वी नोएडाला अंधश्रद्धेमुळे दुर्लक्षित केले गेले, तसेच पश्चिम उत्तर प्रदेशाला "लुटीचे एटीएम" बनवले होते. मात्र आता विकासाच्या दिशेने मोठी पावले उचलली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या विमानतळामुळे दिल्लीतील IGI विमानतळावरील ताण कमी होणार असून, मे महिन्यापासून येथून विमानसेवा सुरू होण्याची शक्यता आहे. आधुनिक सुविधा आणि जलद बोर्डिंग प्रक्रियेमुळे हा विमानतळ प्रवाशांसाठी अत्याधुनिक अनुभव देणार आहे.

## खरातसारख्या माणसाला कोणी पोसलं : सुषमा अंधारे

*१६ वर्षांपासून भोंदूकडून महिलांच्या शोषणाचे प्रकार, मुख्यमंत्र्यांची भेट घेणार*

मुंबई (दै. संध्या)

खरात प्रकरणी आर्थिक गोष्टीचा तपास करण्यात यावा अशी मागणी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहोत. चाकणकर यांचा आयोगाचा आणि प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा एकाच वेळी होऊ शकला असता. आयोगाचा राजीनामा हा मुख्यमंत्र्यांनी द्यायला सांगितला त्यामध्ये काही तटकरेंचा रोल नव्हता. आणि महिला प्रदेशाध्यक्ष पदाचा काही राजीनामा नाही ही गच्छंती आहे,असे सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या की, चाकणकर यांचा महिला प्रदेशाध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांनी राजीनामा घेतला आहे, ते पक्षातील नाराजी ओळखत घेतला



आहे. चाकणकर यांच्यावर आरोपपत्र दाखल होईल असे वाटते. एसआयटीवर विश्वास ठेवायला हवा.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, भोंदू खरात प्रकरणी पोलिस तपास करतील त्या तपासाकडे आमचे लक्ष राहील. रुपाली चाकणकर, दीपक केसरकर यांची या प्रकरणी का चौकशी व्हावी याबद्दल माहिती आम्ही एसआयटी प्रमुखांना दिली आहे. चाकणकर यांचा राजीनामा ही आमची मागणी नाहीच. त्यांना पदावर असताना अटक झाली तर पक्षाची प्रतिमा डागाळेल. त्यांच्या राजीनाम्यासाठी मी नाही तर त्यांच्या पक्षातीलच लोकं आग्रही होते. सुषमा अंधारे म्हणाल्या की, भोंदू खरातकडून 16 वर्षांपासून महिलांचे शोषण सुरू आहे. यात किती केसेस असतील? हजारो केसेस या प्रकरणी असू शकतात. चाकणकर आणि खरात यांचा 12 ते 13 वर्षांपासून संपर्क आहे. खरातला मोठे करणारी लोकं कोण आहेत, तर दीपक केसरकर यांचा मी उल्लेख केला ते शालेय शिक्षणमंत्री? ते एमआयडीसीच्या मैदानावर काय करत होते. आवारे नावाचा माणूस जो जगदंब पतसंस्थेचा प्रमुख आहे त्या पतसंस्थेमध्ये खरातचे आर्थिक व्यवहार असू शकतो त्या आवारेंची चौकशी झाली पाहिजे. खरातसाठी काम करणाऱ्या प्रत्येकाची चौकशी झाली पाहिजे.

## भोंदू बाबा ऋषीकेश वैद्यला अटक

### पुणे पोलिसांनी पिंपरीत ठोकल्या बेड्या; 'मी शंकर, तू पार्वती' म्हणत महिलेवर केला होता बलात्कार

पुणे (दै. संध्या)

अंगात दैवी शक्तीचा संचार असल्याचा दावा करत एका महिलेवर बलात्कार करणाऱ्या भोंदू ऋषीकेश वैद्य याला पुणे पोलिसांनी पिंपरी येथून अटक केली आहे. एका 35 वर्षीय पीडित महिलेने या भोंदू बाबा विरोधात फिर्याद दाखल केली होती. त्याने 'मी तुझा शंकर, तू माझी पार्वती' म्हणत महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. पीडित महिला मूळची पुण्यातील आहे. ऑक्टोबर 2023 मध्ये तिची समाज माध्यमातून वसई येथील ऋषीकेश वैद्य याच्याशी ओळख झाली होती. पीडित महिला व्रतवैकल्ये करत असल्याने, वैद्यने तिला आपल्या जाळ्यात ओढले. 'माझ्या अंगात दैवी संचार आहे. ईश्वराची उपासना



कशी करायची, याचे तंत्र मी तुला शिकवतो,' असे सांगून त्याने महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर, 2023 मध्ये आरोपी पुण्यात आला. त्याने मांजरी परिसरात पीडित महिलेची भेट घेतली. तिथे त्याने महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर आरोपीने तिला पुन्हा वसई येथे बोलावून तिथेही तिच्यावर अत्याचार केल्याचे महिलेने दाखल केलेल्या फिर्यादीत नमूद आहे.

# कोकाटेंचे मंत्रिपद कापण्यासाठी खरातचा तटकरेंना फोन

### शरद पवार गटाचा दावा; चाकणकर अन् तटकरेंना सहआरोपी करण्याची मागणी

मुंबई (दै. संध्या)

राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांना मंत्री करू नये म्हणून भोंदू अशोक खरातने सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंना फोन केला होता, असा मोठा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केला होता. या प्रकरणी त्यांनी कोकाटेंना त्यांच्याकडे असलेली माहिती पुढे आणण्याचेही आवाहन केले आहे. प्रस्तुत प्रकरणात सुनील तटकरेंसह रुपाली चाकणकर यांना सहआरोपी करून त्यांचे व्यवहार तपासले पाहिजेत. कारण अशोक खरात एकटा नसून, त्याची एक मोठी टीम आहे, असेही शरद पवार गटाने म्हटले आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेश प्रवक्ता तथा संघटक सचिव विकास लवांडे या प्रकरणी म्हणाले की, सध्या महाराष्ट्रात गाजत आहे. त्याची नवनवीन प्रकरणे बाहेर येत आहेत. हा लिंगपिसाट भोंदू बाबाने गेल्या काही वर्षांत अनेक महिलांचे शोषण केले. अनेक महिलांचे शारीरिक, मानसिक आर्थिक शोषण केले. या प्रकरणात अनेक मोठे राजकीय व्यक्ती व उद्योजक अडकलेत. ही सर्व काळी कृत्य करणे हे त्याचे एकट्याचे काम नाही. त्याच्याभोवती मोठे रॅकेट किंवा मोठी टीम असल्याशिवाय हे शक्य नाही. कारण, आजपर्यंत त्याच्यावर गुन्हा दाखल होऊ शकला नाही. त्याची कुकर्मे बाहेर आली नाही. विकास लवांडे म्हणाले, अशोक खरातच्या टीममध्ये ज्यांनी आता राज्य महिला आयोगाचा व राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला त्या रुपाली चाकणकरांचा समावेश आहे. त्यांनी उपकार केल्यासारखे राजीनामे दिलेत. त्या त्याच्यात खरोखर आरोपी आहेत. सुनील तटकरे आरोपी आहेत. हे



दोघेही नाशिकच्या विमानतळावर उतरून तेथून गाडीने अनेकवेळा खरातकडे गेले आहेत. अनेक लोकांना त्यांच्या माध्यमातून अशोक खरात भेटला आहे. अशोक खरातचे अनेक व्यवहार या दोघांना माहिती आहेत. त्यामुळे या प्रकरणी खरात, तटकरे व चाकणकरांचे गत काही वर्षांतील सर्व सीडीआर तपासण्याची गरज आहे. त्यांचे मेसेज तपासले पाहिजेत. यांचा संपर्क कुठे, कसा, काय होत होता? व्यवहार कोणकोणते होत होते? हे तपासले पाहिजे. कारण, त्या ट्रस्टच्या विश्वस्तांची अद्याप चौकशी झाली नाही. त्यांच्यावर अद्याप गुन्हे दाखल झाले नाही. या ट्रस्टवर रुपाली चाकणकर स्वतः विश्वस्त होत्या. या ट्रस्टचे जे कुणी अकाउंटचे काम पाहणाऱ्या सीएवरही गुन्हा दाखल करून चौकशी झाली पाहिजे. कारण, मोठे आर्थिक व्यवहार झाले आहेत, असे ते म्हणाले. विकास लवांडे पुढे म्हणाले, या सर्व प्रकरणात सिन्नरचे आमदार माणिकरावर कोकाटे खरातच्या मार्गात अडथळा ठरत होते. कोकाटे या खरातकडे गेल्याचे कुठेही फोटो नाहीत, कुठेही चर्चा नाही. याच खरातने राज्यात सरकार स्थापन होत असताना सुनील तटकरेंना फोन करून कोकाटेंना मंत्री करू नये म्हणून फोन केला होता.

## संपादकीय

# हवी आहे १७ हेक्टर जागा!

छत्रपती संभाजीनगरमधील सफारी पार्कच्या जागेचा प्रश्न पाच वर्षांपासून प्रलंबित आहे. जागा उपलब्धतेची अडचण नेमकी कधी दूर होणार?

मराठवाड्याची व पर्यटनाची राजधानी म्हणून छत्रपती संभाजीनगरची ओळख आहे. औद्योगिकदृष्ट्या जगाच्या नकाशावर मान्यता पावलेल्या शहरातील विकासाची चाके गेल्या काही वर्षांपासून फिरत आहेत, असे म्हटले जाते. मोठ्या औद्योगिक गुंतवणुकीमुळे आगामी काळात शहराचे भवितव्य अधिक उज्ज्वल होईल, असेही दावे केले जातात. छत्रपती संभाजीनगरचा केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी अभियानात समावेश झाला. १००० कोटींच्या अभियानातून काही ठळक कामेही झाली. त्यात शहर सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरलेल्या मास्टर सिस्टीम इंटिग्रेटेड प्रकल्पाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. प्रकल्पांतर्गत शहरात ७५० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले. त्याचे आदेश व नियंत्रण (कमांड व कंट्रोल) केंद्र स्मार्ट सिटी कार्यालयासह पोलिस आयुक्तालयात सुरू करण्यात आले. त्याव्यतिरिक्त रस्ते विकास, वारसास्थळांची डागडुजी, संत एकनाथ रंगमंदिर आणि संत तुकाराम नाट्यगृहाचे नूतनीकरण, बस डेपो आदी ठळक कामांची नोंद घ्यावी लागेल. याशिवाय एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणजे मिटमिटा भागात १०० एकर क्षेत्रात झूलॉजिकल पार्क. या पार्कच्या उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. शहरातील सिद्धार्थ उद्यानात असलेले प्राणीसंग्रहालय झूलॉजिकल पार्कमध्ये स्थलांतरित करण्यात येईल. हे प्राणीसंग्रहालय स्थानिकांसह राज्य, परराज्य आणि परदेशातील पर्यटकांना साद घालणार आहे. पार्कसाठी राज्य सरकारने जागा उपलब्ध करून दिली, तिथे ही उभारणी होत आहे. जागेला लागूनच सरकारची आणखी जमीन आहे. त्या जागेतील १७ हेक्टर जागा सफारी पार्कसाठी मिळावी, असा प्रस्ताव महापालिकाने पाच वर्षांपूर्वी जिल्हा प्रशासनास दिला होता. त्यावर अजूनही निर्णय झालेला नाही. महापालिकेच्या सिद्धार्थ उद्यानातील प्राणीसंग्रहालय खास वाघांसाठी म्हणून ओळखले जाते. तिथे सध्या ११ वाघ आहेत. त्यात पिवळ्या व पांढऱ्या वाघांचा समावेश आहे. या ठिकाणाहून देशभरातील विविध प्राणीसंग्रहालयांमध्ये आजवर ३० हून अधिक वाघ देण्यात आले. वाघांसाठी हे प्राणीसंग्रहालय पूरक मानले जाते. त्यामुळे झूलॉजिकल पार्कला जोडून सरकारने सफारी पार्कसाठी १७ हेक्टर जागा उपलब्ध करून दिली तर तिथे 'टायगर सफारी' सुरू करण्याचा महापालिका प्रशासनाचा मानस आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये टायगर सफारी सुरू झाल्यास ती मराठवाड्यातील पहिलीच टायगर सफारी असेल.

राज्यातील मोजक्याच ठिकाणी असलेल्या प्रकल्पांत त्याचा समावेश होऊ शकेल. वेरूळ, अजिंठा पाहण्यासाठी देश विदेशातून पर्यटक मोठ्या संख्येने शहरात येतात. त्यांचा मुक्काम कमी कालावधीचा असतो. सफारी पार्कचे काम मार्गी लागले तर पर्यटकांचा शहरात मुक्काम वाढण्यासाठी निश्चितच उपयोग होईल. त्यामुळे व्यवसायवाढीला चालना मिळेल.

पर्यटन राजधानीची नवीन ओळख जगासमोर जाईल. राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय उद्योगांच्या निमित्तानेही पाहुणे शहरात मोठ्या संख्येने येतात. त्यांनाही सफारी पार्क ही पर्वणी ठरेल. पार्क सुरू झाल्यानंतर तिथे जाणाऱ्यांना दिवसभर सफर करण्याची सुविधा उपलब्ध करून देता येईल. पर्यटकांसाठी हे महत्त्वाचे ठिकाण असेल. परिणामी अनेक घटकांवर सकारात्मक परिणाम होईल.

सफारी पार्कसाठी जास्तीची जागा मिळावी, यासाठी महापालिकेने जिल्हा प्रशासनामार्फत सरकारकडे प्रस्ताव देऊन पाच वर्षे झाली; पण अद्याप त्यावर काहीच निर्णय नाही. आता सगळ्या निवडणुका झाल्या. महापालिका, राज्य व केंद्रात भाजपची सत्ता आहे.

सर्वत्र एकच पक्षाची सत्ता असताना १७ हेक्टर जागेचा प्रश्न निकाली निघत नाही, हे आश्चर्यच म्हणावे लागेल. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अखत्यारीतील हा विषय आहे. त्यांनी यात लक्ष घातले तर प्रश्न तत्काळ मार्गी लागू शकतो. जागेची मंजुरी मिळाली की पुढच्या कामांना आपसूकच चालना मिळेल. याबाबत लवकर निर्णय व्हावा, ही अपेक्षा.

## संस्कृत सुभाषित

कारे नाठविशी कृपाळू देवासी । पोशितो जगासी एकलाचि

अर्थ – संकुचित बुद्धी व स्वार्थ माणसाला खरे सुख कधीच देत नाही. उदार मन आणि त्याग हाच आपल्या संस्कृतीचा स्थायीभाव आहे.

## गुरु वचन



### प्रगतीसाठी मत्सर नव्हे, प्रेरणेची गरज

मत्सर करणारा माणूस प्रगती करण्याऐवजी इतरांच्या प्रगतीत अडथळे उत्पन्न करीत असतो. असा माणूस मानसिक कुरापतीमुळे स्वत: महत्त्वकांक्षी नसतोच उलट स्वत:च्या व इतरांच्या प्रगतीतील अडसर असतो. त्याची विकृत व संकुचित मानसिकता म्हणत असते कि, मी बसलो आहे तर तूही पुढे जाऊ नकोस. पुढे जाण्यासाठी, प्रगती करण्यासाठीही मत्सराची नव्हे तर प्रेरणेची गरज असते. एखाद्याला एखादी गोष्ट उत्तमरित्या करताना पाहून त्यापासून प्रेरित होणे व त्यांचे अनुकरण करणे माणसाला झुंजार व प्रगतिशील बनवते. तसेच स्पर्धेची भावना पुढे जाण्यास मदत करते. प्रत्येक यशस्वी व्यक्तिने कोणाकडून तरी प्रेरित होऊन व त्याच्या गुणांचे अनुकरण करूनच यश संपादन केलेले असते. कोणाचा मत्सर करून नव्हे. मत्सरामुळे तर आपले भविष्य व करियर दोन्हीही नष्ट होते. म्हणूनच मत्सर जाळून प्रेरणा पाळायला, जोपासणे आवश्यक आहे.

## उपदेशकथा

### चांगुलपणाचा गैरफायदा

एका मंदिराच्या शेजारी एक तलाव होता. तलावाजवळच एक वारुळ होते. त्या वारुळात एक भयंकर विषारी साप राहात होता. तो मंदिरातकिंवा तलावात येणाऱ्या जाणाऱ्यांना त्रास देत असे. कित्येक लोक, वृद्ध, बालके त्यांच्या दंशाला बळी पडली होती.

एकदा त्या मंदिरात एक साधू आला. साधूला विषारी सापाविषयी लोकांनी माहिती सांगितली. तो साधू खूप तपस्वी होता. त्याने त्या वारुळाजवळ जाण्याचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी स्नान करून त्या वारुळाजवळ येताच त्या भयंकर सापाने आपला फणा काढून साधूला अडवले. तो त्याला डसणार इतक्यात तो साधू उत्तरला, अरे, तू असा कितीजणांना डसणार आहेस? निरापराध लोकांची बळी घेऊन आपल्या पापात वाढ करत आहेस? जरा तू पुण्याचा मार्ग स्वीकार. साधूच्या उपदेशामुळे सापाचे परिवर्तन झाले. त्यानंतर काही दिवसांनी साधू त्याच वाटेवरून जात असताना तो साप वारुळाजवळ पडून असल्याचे दिसते. त्याला खूप जखमा झाल्या होत्या. लहान मुले त्याला सतत डिवचत आनंद लुटत होती. साधूने विचारले ही अशी अवस्था कशामुळे झाली? लोकांचा त्रास बंद केल्यामुळे ते मला डिवचतात. साधू म्हणाला, अरे बाबा, लोकांना त्रास द्यायचा नाही पण स्वत:च्या संरक्षणासाठी निदान तू फुत्कार काढून तरी भीती दाखवू शकत होतास ना?

कथा उपदेश : चांगुलपणाचा कोण गैरफायदा घेत असेल तर त्यास जरूर शासन केले पाहिजे.

## पंचांग

| पंचांग | करण:बव १९:२५:२७ |
|---|---|
| २९ मार्च २०२६ | सूर्य:मीन |
| रविवार | चन्द्र:सिंह१४:३७:४० |
| विक्रम संवत्– २०८२ | हिजरी सन् – १४४६ |
| चैत्रशके संवत्– १९४७ | मुस्लिम मास – शव्वाल |
| संवत्सर – पराभवनाम | तारीख – ९ |
| अयन– उत्तरायणारंभ | विशेष |
| मास– चैत्र | कामदा एकादशई |
| ऋतु– सौर वसंत | चैत्री यात्रा – पंढरपूर |
| शुक्ल पक्ष | भाऊ महाराज साल्पेकर |
| तिथि:एकादशी | पुण्यतिथी – नागपूर |
| ०७:४६:४२ | साधू महाराज पुण्यतिथी |
| नक्षत्र:ओषा १४:३७:४० | – उमरखेड (पुसद) |
| योग:धृति १८:१९:०५ | शंभूमहादेव यात्रा – |
| करण:विष्टि ०७:४६:४२ | शिखर शिगणापूर |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 4 | 5 | 3 | | 1 | | 6 |
| | 5 | | 7 | 4 | | | 3 | |
| 2 | | | | | 6 | | 9 | 5 |
| | | 9 | | | 4 | 5 | 1 | |
| | | 2 | | | | 8 | | |
| | 7 | 8 | 6 | | | 3 | | |
| 9 | 2 | | 3 | | | | | 1 |
| | 4 | | | 9 | 5 | | 8 | |
| 1 | | 6 | | 2 | 7 | 9 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 9 | 2 | 8 | 6 | 1 | 5 | 7 | 4 |
| 7 | 8 | 1 | 5 | 3 | 4 | 9 | 2 | 6 |
| 5 | 6 | 4 | 7 | 2 | 9 | 8 | 3 | 1 |
| 1 | 5 | 6 | 2 | 9 | 8 | 3 | 4 | 7 |
| 4 | 7 | 9 | 6 | 5 | 3 | 2 | 1 | 8 |
| 8 | 2 | 3 | 1 | 4 | 7 | 6 | 9 | 5 |
| 2 | 3 | 5 | 4 | 7 | 6 | 1 | 8 | 9 |
| 9 | 4 | 8 | 3 | 1 | 5 | 7 | 6 | 2 |
| 6 | 1 | 7 | 9 | 8 | 2 | 4 | 5 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८६७ – कॅनडा इंग्लंडची वसाहत बनला.
- १८७१ – व्हिक्टोरि राणीने तिच्या पतीचे स्मारक 'प्रिन्स अल्बर्ट हॉलचे उद्घाटन केले.
- १८८६ – अटलांटाच्या जॉन पेंबर्टन यांचे 'कोका कोला' हे स्फूर्तिदायी पेय बाजारात आले.
- १९२० – ब्रिटीश सैन्याचे सेनानी सर विल्यम रॉबर्टसन ब्रिटेनचे पहिले फील्ड मार्शल बनले.
- १९७३ – अमेरिकेची व्हिएतनाममधून संपूर्ण माघार.
- २००७ – चीनमध्ये कोळसा खाणीत झालेल्या स्फोटात २६ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९६२ – भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते पिंपरी येथील हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या पेनिसिलिन कारखान्यातील स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादन प्रकल्पाचे अनावरण झाले.
- १९४४ – इंफाळला जपानी सैन्याचा वेढा.

### जन्म

- १९१२ – इंग्लंडचे माजी पंतप्रधान जेम्स कॅलाहान यांचा जन्म.
- १९१४ – गुप्तहेरगिरी आणि सरकारी गुप्तहेर खाते यांवर अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिणाऱ्या चॅपमन पिंचर या पत्रकाराचा जन्म.
- १९२६ – साहित्यिक बाळ गाडगीळ यांचा जन्म.
- १९४८ – साहित्यिक, समीक्षक नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्म.

### निधन

- १८६६ – इंग्रज कवी जॉन केबल यांचे निधन.
- १९६२ – करमचंद थापर विख्यात भारतीय उद्योगपतीचे निधन.
- १९६४ – शंकर नारायण जोशी प्रसिद्ध इतिहास संशोधकाचे निधन.

## : SMS :

Secret of happy life.....
Get a girl who cooks well
Get a girl who loves you
Get a girl look good
Make sure the 3 girls don't meet each other!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३५.३ | २४.६ |
| अहमदनगर | ३४.४ | २३.८ |
| अकोला | ३७.५ | २४.७ |
| अमरावती | ३६.७ | २४.२ |
| बीड | ३९.६ | २५.९ |
| भंडारा | ४०.३ | २५ |
| बुलढाणा | २९.५ | २०.१ |
| चंद्रपूर | ४०.२ | २५.३ |
| चेन्नई | ३८.३ | २४ |
| नवी दिल्ली | ३०.५ | २१.४ |
| धुळे | ३५.९ | २४.४ |
| गोंदिया | ३८.७ | २४.३ |
| जळगाव | ३७.७ | २३.७ |
| कोल्हापूर | ३५.८ | २३.१ |
| लातूर | ३५.७ | २४.९ |
| मुंबई | ३९.१ | ३०.७ |
| नागपूर | ३७.८ | २५.३ |
| नांदेड | ३७.४ | २५ |
| नंदूरबार | ३३.७ | २३.५ |
| नाशिक | ३५.१ | २२.४ |
| पुणे | ३३.३ | २५ |
| पंढरपूर | ३७.७ | २६ |
| सातारा | ३५ | २१.२ |
| सांगली | ३६.५ | २४ |
| सोलापूर | ३७.९ | २५.५ |
| वर्धा | ३८.४ | २५.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** घरात मंगलकार्याची नांदी होईल. गृहउद्योग अथवा जोडधंद्यातून चांगले लाभ घडून येतील.

**वृषभ :** नव्या ओळखी होतील व त्या फायदेशीर ठरतील. जून्या मैत्रीला उजाळा मिळेल. करमणुकीच्या कार्यक्रमात सक्रीय सहभाग घ्याल.

**मिथुन :** मानसिक स्वास्थ लाभेल. सामाजिक, राजकीय क्षेत्रातील व्यक्तींच्या बोलण्याचा चांगला प्रभाव टाकणारा आहे.

**कर्क :** तरुणांना सुसंधीचा लाभ मिळेल. प्रियव्यक्तीच्या सहाय्याने व्यवसायात भरभराट घडवून आणेल. नोकरीत आपल्या अधिकार कक्षेत वाढ होईल.

**सिंह :** आपल्याला चांगला मार्गदर्शक भेटेल. भावंडांशी सुसंवाद साधाल. अपेक्षित पत्रव्यवहार होतील. नवीन खरेदीचे बेत आखतील.

**कन्या :** आप्तस्वकीयांच्या गाठीभेटी होतील. जुने मित्र भेटल्याने मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.

**तुळ :** तरुणांना सुसंधी लाभतील. धार्मिक – आध्यात्मिक प्रगती साधता येईल. व्यवसायात चांगला उत्कर्ष साधता येईल.

**वृश्चिक :** महत्वाची कामे करताना जिभेवर साखरपेरणी करण्याची गरज आहे. आपल्या बुद्धीकौशल्याच्या जोरावर मोठी मजल माराल.


**धनु :** महत्वाचे निर्णय शांत विचारपूर्वक घरातील मोठ्या व्यक्तिच्या सल्याने घेणे आवश्यक आहे. व्यवसायात नवे तंत्र अंमलात आणू शकाल.

**मकर :** परदेशस्थ भावंडांशी सुसंवाद साधाल. उत्तरार्धात घरात पाहुण्यांची वर्दळ राहील. विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांना यश लाभेल.

**कुंभ :** महत्वाचे निर्णय शांत विचारपूर्वक घरातील मोठ्या व्यक्तिच्या सल्याने घेणे आवश्यक आहे. सामाजिक कार्यात आपल्याला योग्य प्रतिसाद मिळेल.

**मीन :** समाजात आपल्या मतांचा आदर होईल. सकारात्मक विचारांमुळे अनपेक्षित चांगल्या गोष्टी घडतील. कामाच्या विस्ताराचा सतत ध्यास घ्याल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०१



### आडवे शब्द

१. मारुती
५. लाकडाची (वस्तू)
८. राग
११. जास्तीत जास्त व कमीत कमी
१३. रणांगण
१४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस
१५. पातळ खांब
१६. बातमीदार
१७. पुन्हा
१८. संगीतसम्राट
२१. रेती
२३. हिंदीत माळ
२४. प्रख्यात, प्रसिद्ध
२६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप
२८. मांडणी
२९. राजाची पत्नी
३०. विधवेशी लग्न
३२. धुंदी
३३. सापाने टाकलेली त्वचा
३४. पवित्र
३६. कमळ
३७. झोपडी
३८. वर–वधुमधील पडदा
३९. घागरा
४१. धार्मिक गट
४२. आकाश
४४. पिता
४५. फळांचे पेय
४६. रद्द
४७. जन्म–मृत्यू
४९. आणि
५०. नशा आणणारा, कैफी
५२. लोणच्यातील द्रव मसाला
५४. गर्दभ
५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन
५६. फुलांची माळ
५७. एकापेक्षा दुसरा वरचढ
५९. हुक्की, लहर
६०. चौथा हिस्सा
६१. खटला, हक्क सांगणे
६२. एकावर एक रचलेले
६४. नाव हाकणारा
६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
६६. जाळण्यायोग्य
६७. धमनी

### उभे शब्द

२. तोटा
३. आईचा भाऊ
४. –– दमयंती
५. तिबेटी धर्मगुरु
६. दयाळू
७. युद्ध
८. साथसोबत
९. तणाव
१०. अवघड, कष्टप्रद
१२. चावी
१३. पत्नी
१४. राहण्याची जागा
१५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
१७. पळून जाणे
१९. सेनापती
२०. वाकण्याची क्रिया
२१. वायू, वारा
२२. रक्त सांडणे
२३. भडीमार
२५. नमस्कार
२६. विश्वासघातकी
२७. गुणाकार
३१. सरसकट
३३. खर्चात कपात
३४. वार्ता, समाचार
३५. बाळभाषते पाणी
३६. प्रधानमंत्री
४०. तीव्र ऊन
४३. जाणकार
४३अ. नम्र, वाकलेला
४४. ढग (सं), भरभर
४५. अखेरीस
४७. लोकसंख्येची मोजणी
४८. यजमान
५०. मावशीचा मुलगा
५१. गोष्टी सांगणे
५२. संसद सदस्य
५३. रसपूर्ण
५८. उग्र वासाची एक पालेभाजी
६३. फळातील द्रव

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. १०० चे उत्तर

आडवे उत्तर : १.धुंद येथ मी स्वैर झोकितो मद्याचे प्याले ९.दीर १०.टाक ११.कुत्रा १२.वायव्य १४.कणीदार १६.रचनाकर १९.राजा २०.थारा २१.हत्या २२.नवार २४.व २५.वानर २७.यच्चयावत ३०.हरामखोर ३२.वडवानल ३३.सटरफटर ३६.महती ३८.कद ४०.मदार ४१.हार ४२.वा ४३.सटवाई ४५.रफ ४६.कप ४९.काल ५०.खारट ५२.लघळपणा ५४.रत्नजडित ५५.नाना ५६.वासा ५८.मळमळणे ५९.सन ६१.पुणे ६२.वेताळ ६४.खरा ६५.कळ ६६.रामराम ६८.पारावार ६९.तपास ७१.मरुत ७३.जननमरण ७४.वाऱ्यावरची वरात

उभे उत्तर : १.धुंदी २.दरवाजा ३.मीन ४.रमणीय ५.तोटा ६.मकर ७.चेतना ८.लोकुरवाळा १३.व्यथा १५.रहस्यमय १७.चलन १८.कान १९.रामायण महाभारत २३.मायावती २५.वारसदार २६.रबर २८.वड २९.तवाना ३०.हलकट ३१.पोरका ३४.टरफल ३५.फटकळ ३७.हर ३९.दवाखाना ४३.सल ४४.ईर ४७.पपनस ४८.सजविणे ४९.कातरवेळ ५१.टवाळ ५३.घटणे ५५.नाताळ ५७.सामदाम ५८.मलम ६०.नवरस ६१.पुरातन ६३.सैरावैरा ६५.कसम ६६.रातवा ६७.राघव ७०.पान ७१.मण ७२.चाची

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे येथे 'श्री रामनवमी उत्सव समिती'च्या वतीने पुरस्कार' वितरण सोहळा संपन्न!

पुणे (दैनिक संध्या) : धनकवडी (पुणे) येथील 'श्री रामनवमी उत्सव समिती'च्या वतीने आयोजित १३ व्या 'शोभायात्रा रामराज्याची' या सोहळ्यात हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर यांना मानाचा 'हिंदु शौर्य पुरस्कार-२०२६' देऊन गौरवण्यात आले. हिंदु धर्माचे रक्षण, सामाजिक न्याय आणि कायदेशीर लढाईतील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल हा सन्मान करण्यात आला. राजर्षी शाहू बँक चौक ते धनकवडी बस स्टॉप या मार्गावर अत्यंत उत्साहात निघालेल्या भव्य शोभायात्रेचा समारोप मुख्य व्यासपीठावर पुरस्कार वितरण सोहळ्याने झाला. खडकवासला मतदारसंघाचे भाजपचे आमदार श्री. भीमराव (अण्णा) तापकीर यांच्या हस्ते इचलकरंजीकर यांना शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कायदेशीर लढा आणि उल्लेखनीय कामगिरीचा गौरव : अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी प्रदीर्घ काळ हिंदूंच्या हितासाठी न्यायालयात यशस्वी लढा दिला आहे. पुरस्कार प्रदान करताना त्यांच्या खालील कार्याचा विशेष गौरव करण्यात आला.



### आस्करवाडी हल्ला प्रकरणी आरोपी अटकेत; समाजवादी पक्षाचे आंदोलन स्थगित

पुणे (दैनिक संध्या) : शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी रमजान महिन्यात उपवास सोडत असताना सासवडजवळील आस्करवाडी परिसरातील तलावाजवळ मुस्लिम बांधवांवर सशस्त्र समाजकंटकांकडून हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात अनेक जण जखमी झाले असून तिघांना गंभीर दुखापत झाली होती. सदर प्रकरणात सुरुवातीला पोलिसांनी किरकोळ स्वरूपाचे गुन्हे दाखल केल्याने समाजवादी पक्षाने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. गंभीर गुन्ह्यांऐवजी किरकोळ गुन्हे दाखल केल्याच्या निर्णयाला विरोध करत आरोपींवर कठोर कलमे लावावीत आणि त्यांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी करण्यात आली होती. या संदर्भात समाजवादी पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आमदार अबू असिम आझमी यांनी अधिवेशन काळात विधिमंडळात दोन वेळा प्रश्न उपस्थित केला होता. तसेच समाजवादी पार्टी पुणे शहरच्या वतीने दि. २३ मार्च २०२६ पासून ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू करण्यात आले होते. दरम्यान, आज दि. २७ मार्च २०२६ रोजी सकाळी पोलिसांकडून दूरध्वनीद्वारे आरोपींना अटक केल्याची माहिती देण्यात आली. तसेच लेखी पत्राद्वारे आंदोलन स्थगित करण्याची विनंती करण्यात आली. त्यानुसार समाजवादी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकरणातील पोलीस तपासावर समाजवादी पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आमदार अबू असिम आझमी तसेच समाजवादी पार्टी पुणे शहर यांचे लक्ष राहणार असल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे.

### पुणेकरांना वीजदरात दिलासा; सरासरी 30 पैशांनी दर कमी

पुणे (दैनिक संध्या) : वीजदर सरासरी तीस पैशांनी कमी झाल्याने पुणे परिमंडळातील ग्राहकांना ऐन उन्हाळ्यात सुखद दिलासा महावितरणने दिला आहे. परिमंडळातील 38 लाख 71 हजार ग्राहकांचे गणित मांडले, तर महिन्याला सुमारे 10 कोटी रुपये बचत होणार आहे. राज्य सरकारने गुरुवारी वीजदर कमी करण्याची घोषणा केली. त्यामुळे वीजग्राहक खूष झाले. यात घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक, कृषी पंपधारक ग्राहकांना फायदा होणार आहे. महावितरणच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले की, सौर ऊर्जेचे उत्पादन वाढल्याचा हा परिणाम आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना राबविली यातून, 4 हजार मेगावॅट वीज दिली जाते. तसेच, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना राबविली. शेतकरी दिवसा सौरऊर्जेचा वापर सिंचनासाठी करीत आहेत. त्यामुळे या योजनेचा भार इतर ग्राहकांवर पडत नाही. त्यामुळे विजेचे दर सरकारला कमी करता आले.



## सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्ह्ज व टाटा ऑटोकॉम्पच्या पुढाकाराने

# चार जि.प.शाळांमध्ये ‘ग्रीन स्कूल’ प्रकल्पाचे लोकार्पण

पुणे (दै. संध्या) :



पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील शाळांना पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर निधीतून आणि सस्टेनाबिलिटी इनिशिएटिव्हज यांच्या माध्यमातून चार जिल्हा परिषद शाळांमध्ये ग्रीन स्कूल प्रकल्पाचे लोकार्पण नुकतेच झाले. खेड तालुक्यातील बिरदवाडी, देशमुखवाडी, तोरणे आणि रानमळा (कडूस) येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून शाळांमध्ये पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा निर्माण करून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण, ऊर्जा बचत आणि शाश्वत जीवनशैली याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या ग्रीन स्कूल प्रकल्पांतर्गत शाळांमध्ये सोलर ऊर्जा प्रणाली, रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था, ओल्या कचऱ्यासाठी खत निर्मिती यंत्र, तसेच इनडोअर व आउटडोअर वृक्षारोपण करण्यात आले आहे. पाणी संवर्धनासाठी शाळांमध्ये लो-फ्लो वॉटर टॅप्स बसविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वर्षभर पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यासाठी ग्रीन कॅलेंडर शाळांना देण्यात आले आहे. शाळेतील सर्व हरित उपक्रमांची देखभाल व अंमलबजावणी करण्यासाठी विद्यार्थ्यांची ‘ग्रीन आर्मी’ तयार आहे. विद्यार्थ्यांना विज्ञान व पर्यावरण विषयाची आवड निर्माण व्हावी यासाठी सायन्स पार्क भेट, तसेच पर्यावरण संवर्धन, अग्निसुरक्षा आणि जैवविविधता ओळख या विषयांवर मार्गदर्शन व कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. सस्टेनाबिलिटी इनिशिएटिव्हजच्या अपूर्वा कुलकर्णी म्हणाल्या, “पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आमची संस्था नेहमीच पुढाकार घेत असते. शासकीय शाळांना हरित शाळांमध्ये रूपांतरित करण्याच्या उद्देशाने या प्रकल्पाची सुरुवात झाली. टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर निधीच्या सहकार्याने आतापर्यंत ८ शाळांमध्ये ग्रीन स्कूल प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत.”

या प्रकल्पामुळे शाळांमध्ये नैसर्गिक ऊर्जेचा वापर वाढेल, पावसाचे पाणी जमिनीत मुरल्यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होईल, तसेच लो-फ्लो टॅप्समुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होईल. वृक्षारोपणामुळे शाळा परिसर अधिक हरित होऊन विद्यार्थ्यांना स्वच्छ व पर्यावरणपूरक वातावरण मिळेल, असे अमोल उंबरजे यांनी सांगितले.

शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता वाढेल आणि उपलब्ध सुविधांचा योग्य वापर केला जाईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच चारही गावांतील ग्रामस्थ व पालकांनी टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स आणि सस्टेनाबिलिटी इनिशिएटिव्हज यांच्या उपक्रमाचे कौतुक करत आभार मानले.

या प्रकल्पाचे समन्वयक म्हणून प्रियांका बुरंगे, सुमित कापसे आणि शालीन पालेकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## अभंग-गवळणींच्या सुरांनी जंगली महाराज पुण्यतिथी उत्सवात रंगली भक्तीमय मैफल

पुणे (दै. संध्या) :



‘देवाचिये द्वारी उभा क्षणभरी’....‘घेई छंद मकरंद’,‘सावळा नंदाचा मूळ खोटा गे' या अभंग, गवळणी आणि भक्तिरसाने ओथंबलेल्या सुरेल सादरीकरणाने ‘सद्गुरु श्री जंगली महाराज १३६ वा पुण्यतिथी उत्सव’ भक्तिमय वातावरणात रंगला. राजीव बर्वे व प्रियंका बर्वे यांच्या गायन सेवेमुळे रसिक मंत्रमुग्ध झाले.

श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणेच्या वतीने 'सद्‌गुरु श्री जंगली महाराज १३६ वा पुण्यतिथी उत्सव' साजरा करण्यात येत आहे. या उत्सवात राजीव बर्वे व प्रियांका बर्वे यांनी गायन सेवा दिली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रियंका बर्वे यांनी हंसध्वनी रागातील गणपती स्तवनाने केली. त्यानंतर राजीव बर्वे यांनी सादर केलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ‘देवाचिये द्वारी उभा क्षणभरी’ या अभंगाने वातावरण प्रसन्न झाले. पुढे संत तुकाराम महाराजांचे ‘विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म’, ‘मी माझा हरपून बसले गं’, ‘ध्यान करू जाता मन हरपले’, ‘घेई छंद मकरंद’ या अभंगांनी श्रोत्यांना भक्तिरसाचा आनंद दिला.

संत नामदेवांच्या रचनेवर आधारित व श्रीधर फडके यांनी संगीतबद्ध केलेले ‘विठ्ठला आवडी प्रेम भाव’ या सादरीकरणालाही विशेष दाद मिळाली. प्रियंका बर्वे यांनी सादर केलेली ‘सावळा नंदाचा मूळ खोटा गे’ ही गवळण टाळ्यांच्या गजरात रंगली. श्रोत्यांना तल्लीन करणाऱ्या ‘अवघा रंग एक झाला’ या अभंगाने कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमासाठी धनंजय वसवे (ढोलकी), आदित्य आठल्ये (तबला), राहुल गोळे (हार्मोनियम), अनय गाडगीळ (सिंथेसायझर) व राजेंद्र साळुंखे (तालवाद्य) यांनी उत्कृष्ट साथ-संगत केली.

## फडणवीस-आठवले साहेबांच्या पुढाकाराने 'महाड चवदार तळे' विकासकामांना गती!

### डॉ.हुलगेश चलवादी यांनी मानले राज्य सरकारचे आभार

पुणे (दै. संध्या) :

दलितोद्धार चळवळीतील ऐतिहासिक पर्व ठरलेल्या महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष नुकतेच सुरू झाले आहे. राज्य सरकारने यानिमित्ताने चवदार तळे सुशोभीकरण व जलशुद्धीकरण प्रकल्पाचे केलेले भूमिपूजन राज्यातील तमाम आंबेडकरी अनुयायांसाठी अभिमानास्पद बाब ठरतेय. केंद्रीय राज्यमंत्री मा.रामदास आठवले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांना मिळालेले हे विशेष यश आहे; अशा शब्दात आरपीआयचे नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी शुक्रवारी (ता.२७) राज्य सरकारचे आभार मानले.



सुमारे ५५.८० कोटी रुपयांच्या निधीतून साकार होणाऱ्या या प्रकल्पामुळे महाडच्या ऐतिहासिक वारशाला नवसंजीवनी मिळेल. या प्रकल्पामध्ये तळ्याचे जलशुद्धीकरण, परिसराचे आकर्षक सुशोभीकरण तसेच पर्यटनवृद्धीसाठी आवश्यक सुविधा उभारल्या जाणार आहेत. स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनाही त्यामुळे मोठा लाभ होईल, असा विश्वास डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला. येत्या काळात राज्य सरकार तळ्याच्या विकासासाठी आणखी निधी देईल, असे देखील डॉ चलवादी म्हणाले.

मा.आठवले साहेबांच्या विशेष प्रयत्नांमुळेच हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागला आहे. महामानव डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन करत महाडमध्ये ‘शिवसृष्टी’ आणि ‘भीमसृष्टी’ उभारण्याची मागणी देखील साहेबांनी केली आहे. या नाविन्यपूर्ण संकल्पनेचा राज्य सरकार प्रामुख्याने विचार करेल, असा विश्वास डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला.चवदार तळ्याच्या विकासामुळे इतिहास जपत प्रगतीचा मार्ग खुला झाल्याने हा प्रकल्प बहुजन समाजासाठी अत्यंत गौरवास्पद असून सरकारच्या कार्यक्षम नेतृत्वाची ही ठोस झलक असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

## असेंट मेडिटेकचा पुण्यात भव्य वितरक मेळावा; भागीदारी अधिक मजबूत

पुणे (दै. संध्या) :




फ्लेमिंगो ब्रँडमागील असेंट मेडिटेक लिमिटेडने पुण्यात भव्य वितरक मेळावा आयोजित करत आपले वितरक नेटवर्क अधिक मजबूत करण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. या मेळाव्यात प्रदेशभरातील सुमारे १८० वितरक सहभागी झाले होते.

कार्यक्रमास संस्थापक वसीएमडी राजीव मिस्त्री, प्रेसिडेंट – सेल्स अँड मार्केटिंग विवेक भटनागर तसेच पश्चिम विभाग डीजीएम सचिन जोसाळकर उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीच्या भविष्यातील विस्तार आणि धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या मेळाव्यात पुणे व आसपासच्या बाजारपेठेत वितरण साखळी अधिक सक्षम करणे, ग्राहकांपर्यंत पोहोच वाढवणे आणि आगामी आर्थिक वर्षासाठी नियोजन यावर भर देण्यात आला. फ्लेमिंगो ब्रँडने वेदना व्यवस्थापन, ऑर्थोपेडिक सपोर्ट आणि हेल्थकेअर उत्पादनांमध्ये आपले मजबूत स्थान निर्माण केले असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. कंपनीने आपल्या प्रमुख वितरकांचा विशेष सन्मान केला. विशेषतः नितीन डिस्ट्रीब्युटरचे राहुल भंडारी यांचा १३ वर्षांच्या सहकार्याबद्दल गौरव करण्यात आला.

वितरकांशी असलेला विश्वास आणि दीर्घकालीन संबंध हीच कंपनीची खरी ताकद असल्याचे नेतृत्वाने नमूद केले. मजबूत नेटवर्क आणि स्पष्ट धोरणात्मक दृष्टीकोनाच्या जोरावर असेंट मेडिटेक पुणे बाजारपेठेत आणखी विस्तार करण्यास सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## राज्यात अंधश्रध्दा फोफावणे हे शासनकर्त्यांचे अपयश: गोपाळदादा तिवारी

पुणे (दै. संध्या) :

राष्ट्रीय मानसिक आरोग्य संस्थेने’ म्हंटल्या प्रमाणे मानवी वर्तन व निर्णय प्रक्रियेत वैचारिक तर्क लावण्याचे प्रयत्न केले जात नाहीत,” तेंव्हा अनायसे भिती निर्माण होते.

तर्क विसंगत स्वार्थ व लाभासाठी निष्पापींवर अत्याचार होतात व अबला भगिनी अंधश्रध्देस बळी पडून ते या नराधमांच्या विकृत वासनेच्या बळी जातात.

हे दुष्ट चक्र थांबवणे बाबत सरकारी व्यवस्थेची काय पावले पडतात हेच लोकशाही व्यवस्थेत सत्तास्थानी असलेल्या सरकारचे कर्तव्य असते.

देशात प्रगतीशील समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात काँग्रेस सरकारने अंध श्रद्धा- जादू टोणा विरोधी बिल हे समाजाच्या व निष्पाप लोकांच्या रक्षणा साठी केले. मात्र या कायद्याच्या अंमलबजावणी; प्रबोधन व जनजागृती अभावी अबला भगिनी आज ही भोंदू गिरीचे बळी ठरत आहेत हे सत्तेवरील राज्यकर्त्यांचे अपयश असल्याची घणाघाती टिका काँग्रेस चे वरीष्ठ राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पुणे काँग्रेस भवन येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.

याप्रसंगी सुभाष थोरवे, भोला वांजळे तात्या शिर्के, आबा जगताप, गणेश मोरे, राजेश सुतार, संजय अभंग, सुभाष जेधे गणेश शिंदे, उदय लेले, नरेश आवटे आदि उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, येनकेन प्रकारे सत्ता ताब्यात आल्यावर रयते प्रती, लोक रक्षणा प्रती, सामाजिक सुरक्षेच्या राजधर्माला सोईने तिलांजली दिली जाते. हेच संतांच्या, समाज क्रांती कारकांच्या व राष्ट्रपुरुषांच्या पुरोगामी महाराष्ट्रात घडते आहे याची खंत वाटते.

## कन्नड संघाच्या डॉ. कलमाडी शामराव हायस्कूलमध्ये सुरेश कलमाडी स्पोर्ट्स सेंटरचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या) :

कावेरी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या गणेशनगर येथील डॉ. कलमाडी शामराव हायस्कुलमध्ये नव्याने विकसित करण्यात आलेले क्रीडा मैदान आणि सुरेश कलमाडी स्पोर्ट्स सेंटरचे उद्घाटन नुकतेच संपन्न झाले. उद्घाटन समारंभाला सुरेश कलमाडी यांच्या पत्नी मीरा कलमाडी, कन्नड संघाचे अध्यक्ष कुशल हेगडे, सचिव मालती कलमाडी, उपाध्यक्ष इंदिरा सालियन, डॉ. नारायण हेगडे, अद्विक फाउंडेशनचे आदित्य भारतीय आणि पायल कलमाडी- भारतीय आदी मान्यवर उपस्थित होते.

पुण्यात रोजगाराच्या शोधात स्थायिक झालेल्या कन्नड कुटुंबातील मुलांना आपल्या मातृभाषेत शालेय शिक्षण मिळावे या उद्देशाने सुरेश कलमाडी यांचे वडील डॉ. शामराव कलमाडी यांनी कन्नड संघाची स्थापना केली होती. तर क्रीडा क्षेत्रात पुणे शहराची आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण करण्यासाठी सुरेश कलमाडी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

यामध्ये पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन, महाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा नगरीची निर्मिती आणि पुण्याला २००८ साली मिळालेले कॉमनवेल्थ युथ गेम्सचे यजमानपद आदींचा समावेश आहे. त्यांच्या याच योगदानाचा सन्मान करण्यासाठी कन्नड संघाच्या गणेश नगर येथील डॉ. कलमाडी शामराव हायस्कूलमध्ये सुरेश कलमाडी स्पोर्ट्स सेंटर सुरु करण्यात आले आहे.

याअंतर्गत दोन अत्याधुनिक बास्केटबॉल कोर्ट तयार करण्यात आले आहेत. डॉ. कलमाडी शामराव शाळेतील या क्रीडा मैदानाचा विकास करण्यासाठी अद्विक फाउंडेशनकडून ६५ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

यावेळी बोलताना मीरा कलमाडी म्हणाल्या की, “केंद्रीय मंत्री व पुण्याचे खासदार राहिलेले सुरेश कलमाडी यांचे खेळावर खूप प्रेम होते. पुण्यात पहिल्यांदा त्यांनी मॅरेथॉन स्पर्धा सुरु केली. तेव्हा त्यामध्ये ३०० जणांनी सहभाग नोंदवला होता. कालांतराने स्पर्धेचा लौकिक वाढत गेला आणि खेळाडूंची संख्या तीन लाखांपर्यंत जाऊन पोहोचली.” मुलांनी खेळामध्ये सहभाग घेऊन देशाचे नाव मोठे करावे, असे आवाहन देखील मीरा कलमाडी यांनी यावेळी केले.

आपल्या भाषणात मालती कलमाडी म्हणाल्या, “मुलांना आंतरराष्ट्रीय दर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा उद्देश असून खेळाच्या माध्यमातून मुलांना मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होते. या ठिकाणी उभारण्यात आलेली ही सुविधा हा पायलट प्रोजेक्ट आहे. कालांतराने त्याचा विस्तार संस्थेच्या अन्य शाळांमध्ये करण्यात येणार आहे. मुलांमध्ये असणाऱ्या क्रीडा गुणांना प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न आहे. कावेरी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने तिसऱ्या इयत्तेपासून मुलांची क्रीडा क्षेत्रातील प्रतिभा ओळखण्यासाठी एक मॉड्यूल विकसित केले आहे. कावेरी महाविद्यालयातील प्राचार्या डॉ. मुक्ता करमरकर, क्रीडा प्राध्यापक डॉ. रोहित तांबे यांचे यामध्ये मोलाचे योगदान आहे.” संस्थेच्या प्रत्येक शाळेमध्ये एक वैयक्तिक खेळ आणि एक कला प्रकार अनिवार्य आहे. विद्यार्थी वर्गाला त्याचा चांगला फायदा होत असल्याचेही मालती कलमाडी यांनी नमूद केले.



भारतामध्ये क्रीडा संस्कृती वाढविण्यामध्ये सुरेश कलमाडी यांचे योगदान मोठे राहिलेले आहे. खेळामुळे करियरला आकार येण्यास मदत होते, खेळामध्ये वेगळी ताकद असल्याचे अद्विक फाउंडेशनचे आदित्य भारतीय यांनी स्पष्ट केले. सुरेश कलमाडी यांचे खेळावर विशेष प्रेम होते. या क्रीडा केंद्रामध्ये एक वेगळ्या प्रकरची ऊर्जा असल्याचे डॉ. नारायण हेगडे यांनी सांगितले.

इथे मुलांची शारीरिक क्षमता तपासून त्यांची खेळासाठी निवड करण्यात येते. त्यामुळे त्यामधील क्रीडा गुणांचा विकास करणे सहजशक्य होत असल्याचे क्रीडा प्राध्यापक डॉ. रोहित तांबे यांनी नमूद केले. सुमती श्रीनिवासन यांनी आभार मानले. पूजा आंबोले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# कलाकारांनी या वर्ल्ड थिएटर डे निमित्त त्यांच्या नाट्यकलेच्या मुळांना दिला मानाचा मुजरा



**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

साजरा होणारा वर्ल्ड थिएटर डे हा रंगभूमीच्या समृद्ध परंपरेला आणि तिच्या कायमस्वरूपी प्रभावाला दिलेला सन्मान आहे. या निमित्ताने सोनी सब चे कलाकार करुणा पांडे, वरुण बडोला, उत्कर्षा नाईक, रजत वर्मा, ऋषी सक्सेना, दीक्षा जोशी आणि नेहा एस.के. मेहता यांनी आपल्या रंगभूमीच्या प्रवासाची आठवण करून दिली. रंगमंचाने त्यांना दिलेली शिस्त, स्पॉन्टेनिटी आणि प्रेक्षकांशी थेट नाते आजही त्यांच्या अभिनयाला समृद्ध करते. लाईव्ह स्टोरीटेलिंगचे बारकावे आत्मसात करणे आणि रिटेक्सशिवाय परफॉर्मन्सची अनिश्चितता स्वीकारणे—या अनुभवांनी त्यांच्या ऑन-स्क्रीन भूमिकांना अधिक खोली दिली आहे.

करुणा पांडे, जी पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका साकारते, तिने सांगितले, “थिएटरच्या पार्श्वभूमीतून आले असल्यामुळे मी नेहमी मानते की तेच एका कलाकाराच्या प्रवासाचा खरा पाया आहे. लहानपणी माझ्या पालकांनी सततच्या स्थलांतरांनंतरही मला परफॉर्मन्सकडे वळायला प्रोत्साहन दिले, आणि माझ्या बहिणीने मला थिएटर गंभीरपणे घ्यायला प्रवृत्त केले. थिएटरने मला शिस्त, संयम आणि रिटेक्सशिवाय पात्रात पूर्णपणे जगायला शिकवले. आजही त्या शिकवणी माझ्या अभिनयाला आकार देतात. जेव्हा प्रेक्षक ‘पुष्पा’शी जोडले जातात, तेव्हा वाटते की प्रत्येक संघर्ष आणि शंका सार्थक झाली. थिएटरने मला माझा पाया दिला आणि माझ्या कुटुंबाने मला माझं स्वप्न पूर्ण करण्याचं धैर्य दिलं.”

वरुण बडोला, जो इत्ती सी खुशी मालिकेत सुहास दिवेकरची भूमिका साकारतो, त्याने सांगितले, “थिएटर माझ्या प्रवासाचा पाया राहिला आहे. ते तुम्हाला खऱ्या अर्थाने पात्रात शिरायला आणि प्रेक्षकांशी जोडायला शिकवते. माझे वडील विश्व मोहन बडोला यांनी मला कथाकथनाची आवड आणि या कलेप्रती समर्पण दिले. थिएटरने मला संयम, शिस्त आणि सहकार्य शिकवले. मी केलेल्या प्रत्येक भूमिकेत त्या रंगमंचावरील अनुभवांचे प्रतिध्वनी आणि त्यांनी दिलेले अमूल्य धडे कायमसोबत असतात.”

उत्कर्षा नाईक, जी इत्ती सी खुशी मालिकेत माधवी भोसलेची भूमिका साकारते, तिने सांगितले, “थिएटर माझ्या मनाच्या खूप जवळ आहे—फक्त एक परफॉर्मर म्हणून नाही, तर टॅलेंटला वाढवण्यावर विश्वास ठेवणारी व्यक्ती म्हणून. म्हणूनच मी नवोदित कलाकारांसाठी शिकण्याची आणि स्वतःला व्यक्त करण्याची जागा निर्माण केली. मी पाहिले आहे की थिएटर आत्मविश्वास, क्रिएटिव्हिटी आणि व्यक्तिमत्त्व बाहेर आणते. माझ्यासाठी थिएटर म्हणजे फक्त परफॉर्मन्स नाही, तर एक अशी कम्युनिटी तयार करणे ज्यात सगळे एकमेकांना उचलतात आणि वाढतात. हाच थिएटरचा खरा सार आहे.”

दीक्षा जोशी, जी पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्तीची भूमिका साकारते, तिने सांगितले, थिएटरने माझ्या स्टोरीटेलिंगकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला खोलवर आकार दिला आहे. स्टेजवर तुम्हाला प्रत्येक भावना खऱ्या अर्थाने जगण्यासाठी फक्त एकच क्षण मिळतो रिटेक्स नसतात. त्या शिस्तीने आणि उपस्थितीने मला सर्व माध्यमांमध्ये आत्मविश्वास दिला. थिएटर मला नेहमी आठवण करून देते की कला म्हणजे कनेक्शन, परफेक्शन नाही. ते तुम्हाला निर्भय, उत्सुक आणि जमिनीवर राहायला शिकवते हे धडे मी प्रत्येक परफॉर्मन्ससोबत घेऊन जाते.”

रजत वर्मा, जो इत्ती सी खुशी मालिकेत विराटची भूमिका साकारतो, त्याने सांगितले, “थिएटर ही माझ्यासाठी सुरुवात होती आणि ती जोड कायम राहणार आहे. मला रिहर्सल्सची एनर्जी आणि सतत शिकण्याची प्रक्रिया खूप मिस होते. स्टेजवर परफॉर्म करणे म्हणजे शुद्ध आवड, जी फक्त पॅशनने चालते. मी आजही शक्य असेल तेव्हा थिएटरकडे परततो. थिएटरने मला शिकवले की कोणतीही भूमिका छोटी नसते आणि कलाकार म्हणून वाढ होणे हेच खरे महत्त्वाचे आहे.”

नेहा एस.के. मेहता, जी इत्ती सी खुशी मालिकेत हेतल दिवेकरची भूमिका साकारते, तिने सांगितले, “थिएटर माझ्या प्रवासाचा अविभाज्य भाग राहिला आहे आणि इथेच माझ्या परफॉर्मिंगची खरी आवड आकाराला आली. भरतनाट्यमच्या पायामुळे मला शिस्त आणि अभिव्यक्ती शिकायला मिळाली, आणि माझ्या पालकांनी मला कला मनापासून साधायला प्रोत्साहन दिले. थिएटर त्या शिकण्याचा नैसर्गिक विस्तार ठरला. माझ्यासाठी कला म्हणजे मान्यता मिळवणे नाही, तर प्रामाणिकपणा, संयम आणि सतत वाढ.”

ऋषी सक्सेना, जो इत्ती सी खुशी मालिकेत संजय भोसलेची भूमिका साकारतो, त्याने सांगितले, “जरी माझा थिएटर अनुभव थोडा होता, तरी त्याने मला शिस्त, उपस्थिती आणि प्रेक्षकांशी जोडण्याचे अमूल्य धडे दिले. जयपूरमधून आल्यामुळे संधी मर्यादित होत्या, पण त्या सुरुवातीच्या नाटकांनी मला टाइमिंग आणि स्टोरीटेलिंगचा मजबूत पाया दिला. नंतर मी टेलिव्हिजनकडे वळलो, तरी अभिनयाचा सार तोच राहिला आहे आणि थिएटर आजही माझ्या प्रत्येक भूमिकेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला आकार देत राहते.” इत्ती सी खुशी आणि पुष्पा इम्पॉसिबल पाहायला विसरू नका, सोमवार ते शनिवार, फक्त सोनी सब वर.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अवेळीच्या पावसातच आठवडे बाजारात पाण्याची डबकी

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : रणरणत्या उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असताना अचानक झालेल्या जोरदार पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले होते. दुपारच्या वेळी उकाड्यामुळे रस्त्यांवरील वर्दळही कमी झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. अशा परिस्थितीत शुक्रवारी दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होऊन आकाशात ढगांची गर्दी झाली आणि काही वेळातच जोरदार पावसाला सुरुवात झाली. सुरुवातीला रिमझिम असलेला पाऊस काही क्षणातच मुसळधार झाला. या अवेळी पडलेल्या पावसामुळे तापमानात लक्षणीय घट होऊन वातावरणात सुखद गारवा निर्माण झाला. दरम्यान, राजगुरुनगर येथे शुक्रवार हा आठवडे बाजाराचा दिवस असल्याने अचानक पडलेल्या पावसामुळे बाजारात आलेल्या भाजी विक्रेते, फळ विक्रेते, कपडे व स्टेशनरी विक्रेत्यांची एकच धावपळ उडाली. जोरदार पावसामुळे बाजार परिसरात ठिकठिकाणी पाण्याची डबकी साचली. त्यामुळे शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेला भाजीपाला काही प्रमाणात पाण्याखाली गेला. विशेष म्हणजे, येथे करण्यात आलेल्या काँक्रीटीकरणाच्या कामावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पावसाचे पाणी निचरा न झाल्याने बाजारात साचलेले पाणी पाहता संबंधित कामाची गुणवत्ता संशयास्पद असल्याची चर्चा स्थानिक नागरिकांमध्ये सुरू आहे. ठेकेदाराच्या मध्ये करण्यात आलेल्या या कामाचा बोजवारा उडाल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे. तथापि, या पावसामुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून लहान मुले व तरुणांनी या पावसाचा आनंद घेतल्याचेही चित्र पाहायला मिळाले. शेतकऱ्यांसाठीही हा पाऊस काही प्रमाणात दिलासादायक ठरला आहे.

### कुरकूंभ येथे पुणे सोलापूर मार्गावर प्रवासी महिलेवर लैंगिक अत्याचार

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुका कुरकूंभ येथील पोलीस स्टेशन हद्दिमध्ये बुधवार, दिनांक 25मार्च2026 रोजी रात्री 9वाजता पुणे सोलापूर राष्ट्रीय मार्गावर कुरकूंभ वरुन पुण्यात जात असताना पुलाच्या जवळ महिला फिर्यादी थांबली होती एक काळ्या रगाची MH42BN7755 कार गाडी आरोपी अमोल साहेबराव काळे राहाणार खडकी तालुका दौड जिल्हा पुणे हा फिर्यादीच्या जवळ आला कुठे जायचे आहे महिला फिर्यादी पुण्याला जायचे आहे बसा ताई मी पुण्याला चालो पिडीत महिला चार चाकी गाडीमध्ये बसली गाडी दोन किलोमीटर पुढे जाता पिडीत महिलेस शारिरीक सुखाची मागणी केली महिलेने आरडा ओरडा सुरू केला मात्र पाढरे वाडी हद्दीत पिडीत महिलेवर जिवेमारण्याची धमकी देऊन महिलेवरती निर्जल ठिकाणी नेऊन मारहाण करून लैंगीक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. सदर महिलेने दौंड पोलिस स्टेशनला लेखी फिर्याद दिली आहे पोलिसांनी पिडीत महिलेची दखल घेऊन अरोपी अमोल काळे रा,खडकी यास गजाआड केले आहे त्यावर कलम, गु, रन 188/2026 बी, एन, एस, 64 {1} 118 {1} 115, {2} 351 आर्म अॅक्ट कलम 3, 25 इत्तर गुन्हे दाखल केले आहे या घटनेचा पुडील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस दौंड करित आहे.

### जुन्नरच्या वनसंरक्षक स्मिता राजहंस यांना पदक जाहीर



नारायणगाव (दैनिक संध्या) : पुणे वनविभागातील (जुन्नर ) वनपरीक्षेत्र अधिकारी स्मिता शैलेश राजहंस यांना 54 बिबट्या बछड्यांना त्यांच्या आईशी यशस्वीरित्या पुन्हा एकत्र आणण्याच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र शासनाकडून 'उत्कृष्ट कार्याबद्दल सुवर्णपदक' जाहीर झाले आहे. स्मिता राजहंस यांनी 10 वर्षाच्या वनसेवेत विविध ठिकाणी काम करताना वन्यजीव संरक्षण, वनीकरण आणि प्रशासनात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद व नांदुरा तसेच पुणे जिल्ह्यातील मंचर येथे त्यांनी वनपरीक्षेत्र अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली. सध्या त्या जुन्नर वनविभागात सहायक वनसंरक्षक पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी 54 बिबट्या पिल्लांचे त्यांच्या आईशी पुनर्मिलन करण्यात यश आले आहे,तर 50 पेक्षा अधिक बिबट्यांचे बचाव कार्य यशस्वीरित्या पार पडले. जुन्नर येथील माणिकडोह बिबट्या बचाव केंद्राचे प्रभावी व्यवस्थापन तसेच बिबट्यांसोबत सहजीवनाबाबत जनजागृती करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. याशिवाय ४०० हेक्टर क्षेत्रावर वृक्ष लागवड करून सुमारे तीन लाख झाडांचे संवर्धन करण्यात आले. वनक्षेत्रातील 250 हेक्टर अतिक्रमण हटवून 2500 हेक्टर क्षेत्राचे मोजमाप व सीमांकन पूर्ण करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या या कामगिरीची दखलघेत त्यांना हे पदक प्रदान करण्यात आले आहे.

## पिंपळवंडी येथे सासू सुनेचा एकाच दिवशी मृत्यू

**नारायणगाव (दै. संध्या) :**



जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे राहणाऱ्या काकडे कुटुंबातील सासु सुनेचा मृत्यू एकाच दिवशी झाल्याची घटना घडली. पिंपळवंडी येथे राहणारे सचिन काकडे यांनी पाळलेला पाळीव कुत्रा एका भटक्या पिसाळलेल्या कुत्र्याशी झालेल्या झटापटीनंतर पिसाळला होता. तो घरातील सदस्यांवर धावून जात होता.21 नोव्हेंबर 2025 रोजी काकडे यांच्या पाळीव कुत्र्याने त्यांच्याच घरातील अर्चना काकडे यांच्या पायाला चावा घेतला होता. तर वडील सुरेश काकडे यांनाही ओरखडले होते. त्याचवेळी या दोघांवर अँटीरेबीज आणि टीटीचे इंजेक्शन घेऊन खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. मात्र चार महिन्यानंतर सर्व काही सुरळीत असताना अर्चना काकडे यांना अशक्तपणा आणि पाणी कमी पिणे अशी रेबीजची लक्षणे दिसू लागली. त्यानंतर डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र त्यांचा 19 मार्च रोजी रात्री 11 वाजता मृत्यू तर त्याच दिवशी सकाळी दहा वाजता सासू कुसुम सुरेश काकडे यांचा मृत्यू झाला. एकाच वेळी कुटुंबातील दोन अंत्यसंस्कारांमुळे संपूर्ण पिंपळवंडी गावावर शोककळा पसरली आहे.

## TECNO SPARK 50 5G भारतात लॉन्च

### 6500mAh बॅटरी आणि मिलिटरी-ग्रेड मजबुतीची साथ

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारत कधीच थांबत नाही आणि या देशाला पुढे नेणारे लोकही नाहीत. TECNO च्या मते, तंत्रज्ञानानेही या वेगाशी जुळवून घेतले पाहिजे. TECNO SPARK 50 5G हा स्मार्टफोन भारतीय जीवनशैलीच्या अनिश्चित आणि गतिमान प्रवाहाला लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आला आहे. लांब प्रवास, धूळ, पडणे आणि अचानक येणारा पाऊस अशा परिस्थितींमध्येही हा फोन टिकून राहील, यासाठी त्याची रचना करण्यात आली आहे.




लॉन्चबाबत बोलताना TECNO Mobile India चे CEO अरिजीत तलापात्रा म्हणाले, “भारतातील वेगवान बाजारपेठेत ग्राहकांना केवळ स्पेसिफिकेशन्स नव्हे, तर त्यांच्या दैनंदिन जीवनाशी जुळणारा विश्वासार्ह स्मार्टफोन हवा असतो. TECNO SPARK 50 5G हा टिकाऊपणा, कार्यक्षमता आणि विश्वासार्हता यांवर आधारित आहे.”

डिझाइनच्या बाबतीत हा स्मार्टफोन निसर्गप्रेरित प्रीमियम रंगांमध्ये—Fantasy Purple, Mint Green, Champagne Gold आणि Ink Black—उपलब्ध आहे. यामध्ये MIL-STD-810H मिलिटरी-ग्रेड प्रोटेक्शन आणि IP64 प्रोटेक्शन दिले आहे. 6500mAh बॅटरी दीर्घकाळ वापर सुनिश्चित करते, तर FreeLink 2.0 तंत्रज्ञानामुळे नेटवर्क नसतानाही कनेक्टिव्हिटी मिळते. 5G+ कॅरियर अॅग्रीगेशनमुळे स्थिर नेटवर्क अनुभव मिळतो. सॉफ्टवेअरच्या दृष्टीने Segment-first All Scenario Active Noise Cancellation, AI WhatsApp Assistant, Ella Alarm Announcement, AI Writing Assistant, AI Eraser 2.0 आणि AI Image Extender यांसारख्या फीचर्ससह 120Hz डिस्प्ले देण्यात आला आहे.

TECNO SPARK 50 5G ची किंमत 4GB+128GB साठी ₹16,999 आणि 6GB+128GB साठी ₹18,999 आहे. हा स्मार्टफोन ३ एप्रिलपासून ऑनलाइन आणि ऑफलाइन स्टोअर्समध्ये उपलब्ध होईल.

## तांब्याचे हांडे चोरणाऱ्या महिलांच्या टोळीला केली अटक

**नारायणगाव (दै. संध्या) :**



जुन्नर येथील व्यावसायिकाचे रात्रीच्या वेळी गोडाऊन फोडून तांब्याचे हांडे चोरणाऱ्या महिलांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक करण्यात आली आहे.

आनंद हेमंत सासवडे (रा. महाजन आळी जुन्नर) यांचा भांड्याचा व्यवसाय आहे त्यांच्या भांड्याच्या गोडाऊन मधून दि.20 मार्च रोजी रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांनी तांब्याचे एकूण ९० हांडे चोरून नेल्याची फिर्याद जुन्नर पोलीस स्टेशन येथे दिली होती. सदर गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास करत असताना परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता सदर भांड्याच्या गोडाऊनमधून काही अज्ञात महिला हांडे चोरून नेत असताना दिसून आल्या . यावरून सदरचा गुन्हा हा सारिका बबन मकवाने, अंजली सुरज वाघमारे ,सुरेखा राजू वालेकर सर्व (रा.पंचलिंग वस्ती जुन्नर) यांनी केल्याचे निष्पन्न झाले. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गुन्हे शाखेच्या पथकाने कुरण फाटा, जुन्नर येथे सापळा लावून सदर महिलांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या ९० हंड्या पैकी १,३७,५०० रुपये किमतीचे एकूण ५५ हांडे जप्त करण्यात आले आहेत. त्यांची वैद्यकीय तपासणी करून पुढील तपास जुन्नर पोलीस स्टेशन करत आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे,उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण अवचर, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार,सहाय्यक फौजदार दीपक साबळे,पोलीस हवालदार राजू मोमीन,संदीप वारे, अक्षय नवले, महिला पोलीस हवालदार नंदा कदम, सुजाता कदम,जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार सागर हिले यांनी केली आहे.

## ‘गंगा माई की बेटियाँ’मध्ये शहजाद शेखची एन्ट्री; कथानकाला वळण

**मुंबई(दै. संध्या) :**



झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका ‘गंगा माई की बेटियाँ’मध्ये लवकरच अभिनेता शहजाद शेखची एन्ट्री होणार आहे. शिझान खान आणि अमनदीप सिधू प्रमुख भूमिकेत असलेल्या या मालिकेत शहजाद ‘श्लोक’ या हॉटेल व्यवसायिकाच्या भूमिकेत दिसणार असून, त्याच्या आगमनामुळे कथानकात नवे वळण येणार आहे. शहजाद शेखने याबाबत आनंद व्यक्त करत सांगितले की, “झी टीव्हीसोबत पुन्हा काम करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. ‘गंगा माई की बेटियाँ’ ही मालिका मी आधीपासून पाहत होतो. उत्कृष्ट टीम आणि कथानकामुळे या मालिकेचा भाग होणे माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.” आपल्या भूमिकेबद्दल बोलताना तो म्हणाला की, “मी या मालिकेत हॉटेलियरची भूमिका साकारत आहे. विशेष म्हणजे, माझे शिक्षणही हॉटेल मॅनेजमेंटमध्ये झाले असल्याने हे पात्र मला अधिक जवळचे वाटते.”

## चाकणमध्ये थरार : चालकाचे नियंत्रण सुटल्याने रिक्षा कोसळली थेट किल्ल्याच्या खंदकात

**चाकण (दै. संध्या) :**

चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रिक्षा थेट किल्ल्याच्या खोल खंदकात कोसळल्याची धक्कादायक व भीषण घटना चाकण येथील ऐतिहासिक संग्राम दुर्ग किल्ल्यात शुक्रवारी रात्री उशिरा घडली. या घटनेत रिक्षाचा अक्षरशः चक्काचूर झाला असून, रिक्षाचालक गंभीर जखमी झाला आहे.

अधिक माहिती अशी की, चाकण येथे ऐतिहासिक संग्राम दुर्ग किल्ला आहे. या किल्ल्याच्या सभोवतालच्या रस्त्यावरून जात असताना रिक्षा चालकाचे अचानक वाहनावरील नियंत्रण सुटले. किल्ल्याच्या कडेला संरक्षक भिंत अथवा पुरेसे अडथळे नसल्याने रिक्षा थेट खोल खंदकात जाऊन कोसळली. या घटनेची वार्ता चाकण शहरात वाऱ्यासारखी पसरताच पंचक्रोशीत खळबळ उडाली. हा धक्कादायक प्रकार पाहण्यासाठी नागरिकांनी किल्ल्यालगत तोबा गर्दी केली. येथील नागरिकांनी अपघात होताच घटनास्थळी धाव घेत क्रेन पाचारण करून जखमी चालकाला क्रेनच्या साहाय्याने अथक प्रयत्नातून नुकसान झालेल्या रिक्षासह खंदकातून बाहेर काढण्यात यश मिळवले. जखमी रिक्षाचालकाचे नाव समजले नसून, अधिक उपचारासाठी त्याला येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने या घटनेत जीवितहानी टळली असून, रिक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातानंतर परिसरात नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. किल्ल्याच्या सभोवतालच्या रस्त्यांची दुरावस्था आणि अपुऱ्या सुरक्षा साधनांमुळे असे अपघात घडत असल्याचा आरोप नागरिकांकडून होऊ लागला आहे. सुदैवाने या रिक्षात प्रवासी नसल्याने मोठा अनर्थ टळला आहे. किल्ल्याच्या खंदकात रिक्षा कोसळल्याने या घटनेने प्रशासनाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## नेहरूनगर येथील साईनाथनगरमध्ये २५२ सदनिकांच्या चावींचे दणक्यात वाटप

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी चिंचवड शहरातील झोपडीधारकांसाठी आनंदाचा क्षण ठरलेल्या कार्यक्रमात साईनाथ नगर, नेहरूनगर येथील एसआरए अंतर्गत बांधण्यात आलेल्या आर.के. प्लाझा इमारतीतील २५२ सदनिकांचे चावी वाटप मोठ्या उत्साहात पार पडले. दिनांक २८ मार्च २०२६ रोजी आयोजित पुनर्वसन प्रकल्पातील घरांच्या चाव्या वाटपाचा या कार्यक्रमात महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे तसेच माजी महापौर हनुमंतराव भोसले (अण्णा) यांच्या हस्ते लाभार्थींना चाव्या देण्यात आल्या. या वेळी प्रभाग क्रमांक ९ मधील कार्यसम नगरसेवक राहुल भोसले,नगरसेविका डॉक्टर वैशाली घोडेकर (लोंढे) नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते विशाल मासुळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिश माने, तसेच प्रकल्पाचे विकासक राजेंद्र कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या पुनर्वसन प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे सदनिकांसोबतच घरगुती वापरासाठी आवश्यक सुविधा देण्यात आल्या आहेत. लाभार्थींना गॅस शेगडी, गिझर, वॉशिंग मशीन, पाणी फिल्टर, वायफाय व केबल नेटवर्क कनेक्शन अशा सुविधा देत घराचा ताबा देण्यात आला.

पिंपरी चिंचवड शहरात प्रथमच अशा प्रकारे सर्व सोयी-सुविधांनी युक्त सदनिका देण्यात आल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरसेवक राहुल भोसले यांनी शहरातील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या माध्यमातून ०५ हजारांहून अधिक झोपडीधारकांना पक्के घर उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. कार्यक्रमात बोलताना उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांनी नव्या घरात प्रवेश करणाऱ्या सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

माजी महापौर हनुमंतराव भोसले (अण्णा) म्हणाले की, “झोपडीतून सुसज्ज घरात जाण्याची संधी ही मोठी बाब असून नागरिकांनी या घरांची स्वच्छता व निगा राखून आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी.” नगरसेवक राहुल भोसले यांनीही सर्व लाभार्थींना शुभेच्छा देत पुढील काळातही नागरिकांच्या विकासासाठी कटिबद्ध राहण्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रकल्पाचे विकासक राजेंद्र कदम यांनी उपस्थित मान्यवर व नागरिकांचे आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### दुचाकीसाठी नोंदणी क्रमांकाची नवीन मालिका सुरु

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी 'एनजी' ही नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. नव्याने सुरु होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित तीनपट शुल्क भरून हवे असतील अशा चारचाकी वाहन मालकांनी १ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा. दुचाकी मालिकेतील उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक दुचाकी वाहनांसाठी आरक्षित करण्यासाठी २ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वा. विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा. अर्ज कार्यालयाच्या नवीन वाहन नोंदणी विभागात धनाकर्ष (डीडी), पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधारकार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी 'डी.वाय.आय.टी.ओ., पिंपरी चिंचवड' यांच्या नावे राष्ट्रीयकृत, अनूसचित बँकेचा पुणे येथील असावा. अर्जदाराने ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत फोटो ओळखपत्र तसेच पत्त्याच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, दूरध्वनी देयक आदींची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. चारचाकी वाहनांसाठी क्रमांकांची यादी २ एप्रिल रोजी सकाळी कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास २ डिसेंबर रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा.

### भोसरी एमआयडीसीत कंपनीला भीषण आग; सुदैवाने जीवितहानी टळली

पिंपरी (दैनिक संध्या) : भोसरी एमआयडीसी परिसरातील एका लघुउद्योग कंपनीत भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र कंपनीतील विविध यंत्रसामग्री आणि पार्ट्सचे मोठे नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार आज (दि.२७) दुपारी सव्वा बारा वाजण्याची सुमारास MIDC परिसरातील एफ-2 ब्लॉक, प्लॉट क्रमांक 5/2/3 येथे असलेल्या डि-टेक ऑटोमेशन, कॉलिटी कन्व्हर्स आणि दर्शन केमिकल या कंपन्यांमध्ये शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत प्लायवूड, महत्त्वाची कागदपत्रे, कॉम्प्युटर तसेच विविध यंत्रसामग्री जळून नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. प्राथमिक माहितीनुसार, ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज अग्निशमन दलाने व्यक्त केला आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या तीन गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आणि आगीवर वेळीच नियंत्रण मिळवण्यात यश आले. दरम्यान, आग लागलेली संबंधित कंपनी अनधिकृत असल्याची माहितीही या घटनेनंतर समोर आली आहे. याप्रकरणी संबंधित विभागाकडून पुढील चौकशी सुरू असून, नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास कारवाई होण्याची शक्यता आहे.

### पीएमआरडीएविरोधात तक्रारींचा पाऊस; नागरिकांची धाव प्रशासनाकडे

पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात गत वर्षभरात 223 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी 207 तक्रारींचे निरसन झाल्याचा दावा पीएमआरडीए प्रशासनाने केला आहे. तर, केंद्र शासनाच्या पीजी पोर्टल अर्थात प्रशासकीय आणि लोक सुधारणा या अॅपवर 64 तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. नागरिकांच्या या तक्रारींचे तातडीने निरसन करण्यात येत असून, त्याचा आढावादेखील घेण्यात येत असल्याचे प्रशासन विभागाने सांगितले. गेल्या वर्षभरात वेगवेगळ्या विभागाच्या जवळपास 223 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये अतिक्रमण बांधकाम व निर्मूलन विभाग, जमीन व मालमत्ता विभाग तसेच, विकास परवानगी विभागाच्या सर्वाधिक तक्रारी असल्याचे दिसून येते. काही तक्रारी या कार्यालयात प्रत्यक्ष आलेल्या आहेत. तर, केंद्र शासनाच्या पीजी पोर्टल अर्थात प्रशासकीय सुधारणा आणि लोक शिकायत या पोर्टलवर 64 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी 54 तक्रारींचे निरसन करण्यात आले आहे. प्राधिकरणातील वेगवेगळे तब्बल 11 विभाग आहेत. त्यात अतिक्रमण, बांधकाम नियंत्रण व निर्मूलन विभाग, प्रशासन विभाग, विकास परवानगी विभाग, नियोजन विभाग, अभियांत्रिकी 1 आणि 2, अग्निशामन नियंत्रण विभाग, जमीन व मालमत्ता विभाग, वित्त नियंत्रक आणि नियोजन हे महत्त्वाचे विभाग आहेत. प्राधिकरणामध्ये पिंपरी चिंचवड, पुणे आणि ग्रामीण भागाचा मोठा परिसर जोडला आहे. नऊ तालुक्यांचा कारभार आहे. दरम्यान, आकुर्डी आणि औंध या दोन ठिकाणी कार्यालय आहे. परिणामी, वेगवेगळया तालुक्यांतून या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. एकाच वेळी कामे होत नसल्याने नागरिकांना नाईलाजाने तक्रारी कराव्या लागत आहेत.




### आकुर्डी, निगडी, चिंचवडमध्ये वारंवार वीज खंडित; नागरिक संतप्त

आकुर्डी (दैनिक संध्या) : सातत्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. सध्या तापमानात मोठी वाढ होऊ लागली आहे. उकाडा व उन्हापासून संरक्षण करण्यासाठी फॅन, कुलर, एसी आदी कुलिंग साहित्य घरोघरी सुरू आहेत; परंतु वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांसह व्यावसायिक त्रस्त आहेत. आकुर्डी, निगडी, चिंचवड परिसरातील वीजपुरवठा सुरळित करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. दिवसेंदिवस तापमानात झपाट्याने होणारा बदल, सध्या सुरू असलेल्या शालेय विद्यार्थ्यांची परीक्षा, दुपारी उन्हाने होणारी शरीराची काहीली या सर्वांच्या पार्श्वभूमीवरती ज्येष्ठ नागरिक, महिला, मुले यांना खंडित विद्युत पुरवठ्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. नेहमीच येतो पावसाळा या म्हणीप्रमाणे निगडी, चिंचवड, आकुर्डी या परिसरामधील महावितरणकडून केला जाणारा विद्युत पुरवठा विविध कारणाने खंडित केला जातो. यामुळे महावितरणकडून सर्वसामान्य ग्राहकांची गैरसोय केली जात आहे. या संदर्भात महावितरणविषयी सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची भावना निर्माण झाली आहे. सध्या सर्वत्र सीबीएससी व स्टेट बोर्डच्या वार्षिक परीक्षा सुरू असून, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कालावधी मानला जातो. यातच रात्री व दिवसभरामध्ये सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे.

# 'शब्दांशी जोडले नाते' साहित्यविश्वात

## पहिल्यांदा विद्यार्थ्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न

**पिंपरी (दै. संध्या) :**

प्रणाली प्रकाशन आणि न्यू इंग्लिश स्कूल, माण यांच्या संयुक्त विद्यमाने लेखिका कल्पना चांदमल बंब यांच्या 'शब्दांशी जोडले नाते' या पुस्तकाचे प्रकाशन शुक्रवार, दिनांक २७ मार्च २०२६ रोजी न्यू इंग्लिश स्कूल, माण विद्यालयात करण्यात आले. पुस्तक प्रकाशनाच्या अध्यक्षस्थानी कु. मिसबाह शफिक खान ( इयत्ता ११ वी) होत्या. प्रमुख अतिथी कु. रेश्मा राकेश प्रजापती ( इयत्ता ११ वी) कु. अर्पिता भाऊराव पवार ( इयत्ता ९ वी ) या विद्यार्थ्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी प्रणाली प्रकाशनच्या शामला पंडित - दीक्षित, न्यू इंग्लिश स्कूल, माण विद्यालयाचे मुख्याध्यापक अंबादास रोडे, ज्येष्ठ साहित्यिक नारायण कुंभार, लेखिका कल्पना बंब व्यासपीठावर विद्यार्थ्यांसमवेत होते.

तुळशीला पाणी घालून, गणेश स्तवन म्हणून आणि विद्यार्थ्यांच्या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रास्तविक लेखिका कल्पना बंब यांनी केले. यावेळी त्या म्हणाल्या की, 'आजच्या मोबाइल आणि इंटरनेट युगात वाचनसंस्कृती लोप पावू लागली आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी लागावी यासाठी प्रकाशित होणारे 'शब्दांशी जोडले नाते' हे पुस्तक प्रकाशनापूर्वीच ज्या विद्यार्थ्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन होणार आहे त्यांना देण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रकाशित होणारे पुस्तक वाचले आहे. वाचन संस्कृतीचा जागर व्हावा म्हणून विद्यार्थ्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन करण्याची संकल्पना राबवली. याप्रसंगी संतसाहित्याचे अभ्यासक अशोक महाराज गोरे, सुरेश कंक, राधाबाई वाघमारे, अमरदीप मखामले, विलास कुंभार उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्ष कु. मिसबाह खान म्हणाल्या, "शब्दांशी जोडले नाते' या पुस्तकातून कल्पना बंब यांनी समाजाचे ज्वलंत प्रश्न आणि त्यांची उत्तरे याचे विवेचन अचूकपणे केले आहे.

मन, शब्द, जीवन, समाधान, सणांचे महत्त्व, स्त्री समस्या हे सारे लेख माणसाला अंतर्मुख करतात. पानापानांतून नवा विचार घडू दे आमच्या अंधारमय जीवनाला तुमच्या लेखणीतून तेज मिळू दे! 'शब्दांशी जोडले नाते' हे पुस्तक घराघरांत पोहचू दे! मराठी साहित्याचा सुगंध पूर्ण जगात पोहचू दे!' असे विचार मांडले.

कु. रेश्मा प्रजापती यांनी, 'शब्दांशी नाते कसे जोडावे हे या पुस्तकातून कळते. शालेय विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचली पाहिजेत. मनन, चिंतन केले पाहिजे. पुस्तके वाचल्याने विचार प्रगल्भ होतात. पुस्तके वाचली तर आजचे विद्यार्थी उद्याचे लेखक होतील!' असे विचार मांडले. अर्पिता पवार या विद्यार्थिनीने, 'आपण पुस्तके वाचली तर त्यातून करुणा, आनंद, कष्ट, यश, बंधुत्व यांच्या जाणिवा समृद्ध होतात. सकारात्मक विचार करण्याची प्रेरणा पुस्तकातून मिळते!' असे मत व्यक्त केले. कवयित्री राधाबाई वाघमारे आणि कवी विलास कुंभार यांनी कविता सादर केल्या. साहित्यिक नारायण कुंभार, अंबादास रोडे, प्रकाशिका शामला पंडित दीक्षित यांनी मनोगत व्यक्त केले. पूजा बंब, कीर्ती मुथा, छाया सुराणा, संदीप ओसवाल, श्रीकांत सुराणा, खनक मुथा, मितांश मुथा, गोकुळ गायकवाड, संभाजी थिटे, विजय भांगरे, शुभम गायकवाड, शीतल टकले, साधना कानडे, मनीषा मोरे, ज्योती गायकवाड, बाळासाहेब जाधव, सुदाम केळकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. सीमा गांधी यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. सुभाष चव्हाण यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## तळेगाव दाभाडे न.प.मध्ये समित्यांची बिनविरोध निवड

**तळेगाव दाभाडे (दै. संध्या) :**

नगर परिषदेच्या विषय समितीच्या सभापती, सदस्यांची बिनविरोध निवड झाली आहे. पाणीपुरवठा व जलनि:स्सारण समितीच्या सभापतीपदी गणेश काकडे, स्वच्छता वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीची सभापतीपदी निखिल भगत, सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापती सुदाम शेळके, नियोजन आणि विकास समितीच्या सभापतीपदी दीपक भेगडे, शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समितीच्या सभापतीपदी भारती धोत्रे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी शैलजा काळोखे आणि स्थायी समितीच्या सभापतीपदी संतोष दाभाडे पाटील यांची निवड झाली आहे.



शुक्रवारी (दि. 27) तळेगाव दाभाडे नगर परिषद कार्यालयातील सभागृहामध्ये विषय समित्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन करणे, विषय समित्यांच्या सभापती पदांची निवड करणे व स्थायी समिती गठित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेच्या सुरुवातीलाच पीठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी गिरीश दापकेकर यांनी विषय समित्यांवर सभासद निवडीबाबत आणि स्थायी समिती गठित करण्याबाबतची माहिती सदस्यांना दिली.

### महापालिकेच्या अग्नीशमन विभागाकडून ६७४ हॉस्पिटल्सना नोटीस

## केवळ १३८ रुग्णालयांकडेच अग्नीशमन प्रमाणपत्र

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील रुग्णालये, दवाखाने हे अग्नीशमन विभागाच्या रडारवर आली आहेत. केवळ १३८ खाजगी रुग्णालयांनी अग्नीशमन विभागाकडून फायर ऑडीट करत अग्नीशमन प्रमाणपत्र घेतले आहे. मात्र, शहरातील तब्बल ५३६ हॉस्पीटल्सने अद्यापही अग्नीशमन सुरक्षा यंत्रणा अद्यावत केलेली नाही. त्यामुळे सुरक्षा सप्ताहामध्ये सर्व रुग्णालये, दवाखान्यांची तपासणी करण्यात येणार आहे.

शहरातील तब्बल ६७४ रुग्णालये, तसेच दवाखान्यांनी अद्यापही आगप्रतिबंधक यंत्रणा अद्ययावत केली नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अशा रुग्णालयांना महापालिकेने नोटिसा बजावल्या असून, तातडीने त्रुटी दूर करून यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, त्यानंतरही यंत्रणा अद्ययावत न केल्यास कारवाई केली जाणार आहे. या तपासणीत शहरातील सर्व खासगी रुग्णालयाच्या फायर सुरक्षा यंत्रणा अर्लट असल्याबाबत खातरजमा करण्यात येणार आहे.

महापालिकेच्या अग्निशामक दलाकडून छोटे-मोठे दवाखाने, रुग्णालयांना आगप्रतिबंधक यंत्रणा बसविणे, ती सुस्थितीत ठेवण्यासाठीची तपासणी करून घेणे किंवा फायर ऑडिट करण्यास प्राधान्य दिले जाते. शहरातील रुग्णालयांना वारंवार सूचना दिल्या जातात. त्यात बहुतांश रुग्णालयांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळतो, मात्र काही रुग्णालयांकडून फायर ऑडिट किंवा आगप्रतिबंधक यंत्रणेच्या तपासणीकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याची सद्यःस्थिती समोर येत आहे.

वाढती उष्णता आणि हॉस्पीटल विद्युत शॉर्ट सर्किट घटनांमुळे दरवर्षी हॉस्पिटलला आग लागण्याचा धोका वाढत आहे. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने राज्यातील रुग्णालये, आरोग्य केंद्राना अशा विनाशकारी घटना टाळण्यासाठी सक्रिय उपाययोजना करण्यासाठी आदेश दिले आहे.

## शहरात सापांचे दर्शन वाढले; मिलन हंगामामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी: चिंचवड येथील केशवनगर या भागामध्ये एका नागरिकाच्या व्हरांड्यामध्ये नागाची जोडी आढळून आली; तसेच चऱ्होलीतील एका सोसायटीमध्ये एकाच वेळी तीन साप आढळले. तिरूपती सोसायटीमध्ये नाग आढळला. साप दिसण्याच्या घटनांमुळे शहरामध्ये दररोज सर्पमित्रांना 10 ते 15 कॉल येत आहेत. शहरी वस्तीमध्ये साप दिसू लागल्याने शहरवासीयांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मार्च ते जून हा काळ सापांच्या मिलनाचा असल्याने नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन सर्पमित्रांकडून केले जात आहे.

उन्हाळ्याचा हंगाम सुरू होताच निसर्गात अनेक बदल घडू लागतात आणि वन्यजीवांच्या जीवनचक्रातही महत्त्वाचे टप्पे सुरू होतात. याच काळात सापांच्या अनेक प्रजातींमध्ये प्रजनन (मेटिंग) हंगाम सुरू होतो. विशेषतः धामण आणि नाग या सर्प प्रजातीमध्ये मार्च ते जूनदरम्यान मेटिंगचा काळ असतो. तापमान वाढ, दिवसाची लांबी वाढणे आणि अन्नाची उपलब्धता या सर्व घटकांमुळे साप अधिक सक्रिय होतात.

धामण हा भारतात मोठ्या प्रमाणात आढळणारा बिनविषारी साप आहे. त्याची लांबी 6 ते 10 फुटांपर्यंत असू शकते. तो अतिशय वेगवान आणि चपळ असतो. धामण प्रामुख्याने उंदीर, पाल, बेडूक, पक्ष्यांची अंडी यांवर उपजीविका करतो. त्यामुळे शेतीसाठी तो अत्यंत उपयुक्त ठरतो. मेटिंगच्या काळात नर मादीसाठी स्पर्धा करतात. या स्पर्धेला कॉम्बॅट डान्स असे म्हणतात, ज्यामध्ये दोन नर एकमेकांभोवती वेटोळे घालून उभे राहण्याचा प्रयत्न करतात. हे दृश्य पाहताना अनेकांना ते भांडत आहेत असे वाटते; परंतु प्रत्यक्षात ही एक नैसर्गिक स्पर्धा असते. या प्रक्रियेनंतर मादी सुरक्षित ठिकाणी अंडी घालते आणि काही आठवड्यांत त्यातून पिल्ले बाहेर पडतात.

## आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते अॅड. एम. बी. वाघमारे यांचे निधन

**पिंपरी (दै. संध्या) :**

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते, मुळशी पंचायत समितीचे माजी सदस्य आणि संत तुकाराम साखर कारखान्याचे माजी संचालक अॅड. मधुकर बळवंत उर्फ एम. बी. वाघमारे (वय ८९) यांचे अल्पश: आजाराने गुरुवारी पहाटेच्या सुमारास पुण्यातील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. ते पुणे महापालिकेचे माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

मुळशी तालुक्यातील वाकड गावचे सुपुत्र असलेले अॅड. मधुकर वाघमारे यांनी १९६३ मध्ये कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील भूमीहिनांच्या चळवळीत सहभाग घेतला तसेच अनेक वर्ष आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व करून महाराष्ट्रातील गोरगरीब, कष्टकरी, दलित, श्रमिक, झोपडपट्टी वासियांसाठी भरीव काम केले.

आपल्या सामाजिक व राजकीय जीवनात त्यांनी मुळशी तालुका पंचायत समितीचे सदस्य, संत तुकाराम साखर कारखान्यावर संचालक आणि डॉ. आंबेडकर सहकारी बँकेचे संचालक म्हणून काम केले.

पौड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा साकारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. ते पुतळा उभारण्याच्या समितीचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांनी पुणे शहर, पिंपरी चिंचवड आणि जिल्ह्यातील बुद्ध विहारांच्या जडणघडणीत उल्लेखनीय व मोलाचे योगदान दिले. या कार्याची दखल घेऊन त्यांना सामाजिक न्याय विभागाने समाजभूषण पुरस्काराने गौरवले होते.

भाऊसाहेब वाघमारे यांची तब्बेत बिघडल्याने त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना गुरुवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर दुपारी औंध येथील स्मशानभूनीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



यावेळी आमदार बापूसाहेब पठारे, माजी आमदार अॅड. जयदेवराव गायकवाड, पुणे महापालिकेचे माजी आयुक्त रत्नाकर गायकवाड, उपमहापौर परशुराम वाडेकर, माजी महापौर दत्तात्रय गायकवाड, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, सुनिता वाडेकर, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक राहुल कलाटे, कुणाल वाव्हळकर , माजी पोलिस अधिकारी चंद्रशेखकर दैठणकर, शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, पीएमपीएमएलचे संचालक अजय खेडेकर, नगरसेवक अॅड. अविनाश साळवे, राजाभाऊ बराटे, निलेश आल्हाट, भंते नागघोष, लोकमतचे संपादक संजय आवटे, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष शैलेश मोरे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे,माजी नगरसेवक उज्वल केसकर, विरेंद्र कराड, अविनाश बागवे, सुशील मेंगडे, ज्येष्ठ कार्यकर्ते वसंत साळवे ,अशोक धिवरे, एम टी कांबळे असित गांगुर्डे, विलास वनशिव, राहूल डबाळे, महिपाल वाघमारे, किरण आल्हाट, संगीता आठवले, निवेदक दीपक म्हस्के, सुखदेव तात्या सोनवणे डॉ. राजेश थोरात संजय बनसोडे, रवींद्र चव्हाण, दिलीप कुसाळे, शेखर जावळे, डॉ.पवन साळवे, अनिल सूर्यवंशी, शरद जाधव, रवींद्र दुधेकर, रोहिदास गायकवाड, प्रमोद निरभवणे, दीपक हूबरे , पत्रकार सुनील कांबळे,शाम सोनावणे, देवा भालके, मुकेश जाधव, शैलेश जाधव आदींसह आंबेडकरी चळवळीतील विविध कार्यकर्ते, समाजाच्या विविध घटकातील मान्यवर व महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नॅशनल हेल्थ क्लेम एक्सचेंज स्पर्धेत पीसीसीओइला पाच लाखांचे बक्षीस

**पिंपरी (दै. संध्या) :**

राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण यांच्या वतीने आयआयटी, हैदराबाद येथे आयोजित केलेल्या "नॅशनल हेल्थ क्लेम एक्सचेंज हॅकॅथॉन २०२६ अॅक्सिलरेटिंग हेल्थ क्लेम्स जर्नी" या स्पर्धेत पीसीसीओइच्या टीमने प्रथम क्रमांक पटकावला आणि पाच लाख रुपयांचे बक्षीस मिळवले.

या टीम मध्ये तृतीय वर्ष विद्यार्थी अभिषेक निकम, तृप्ती सुकाळे, कोसदा भट आणि द्वितीय वर्ष विद्यार्थी हर्षिल बियाणी व अंश दुधे यांचा समावेश होता.

पीसीसीओई चे संचालक व प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, विभाग प्रमुख डॉ. अनुराधा ठाकरे, सह प्राध्यापक डॉ. सांत्वना गुडधे यांनी मार्गदर्शन केले.



ही स्पर्धा हैदराबाद येथे राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण द्वारा आयआयटी हैदराबाद, एनआरसीइएस, जनरल इन्शुरन्स कौन्सिल, गुगल, इंडिया इन्सुरटेक असोसिएशन आणि एनएचसीएक्स यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा देशभरातील नवोन्मेषक, स्टार्टअप्स आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन भारताच्या आरोग्यसेवा डिजिटल मध्ये परिवर्तित करून त्यांना बळकटी देणे हा उद्देश होता.

यामध्ये पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओइ) कॉम्प्युटर एआय एमएल विभागातील विद्यार्थ्यांनी देशभरातील प्रतिभावान स्टार्टअप्सशी स्पर्धा करून "प्रोब्लेम सॉलविंग ३" या विभागात ५,००,००० रोख बक्षीसा सह प्रथम क्रमांक पटकावला. या टीमने 'क्लेमसिंक एआय' नावाचा एक नाविन्यपूर्ण उपाय विकसित केला. यामध्ये जटिल आणि असंरचित आरोग्य विमा कागदपत्रांना संरचित, इंटर ऑपरेबल डिजिटल डेटामध्ये रूपांतरित करण्यासाठी डिझाइन केलेला प्लॅटफॉर्म आहे. या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत पीसीसीओईला प्रतिनिधित्व करण्याची संधी आणि प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळणे हा एक समृद्ध अनुभव आहे असे पीसीसीओई चे संचालक व प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले.

यशस्वी टीम आणि मार्गदर्शकांचे पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओइचे संचालक व प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### तुकाराम सावंत यांची शिरोली सोसायटीच्या चेअरमनपदी नियुक्ती

चाकण (दैनिक संध्या) : अडीच कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या खेड तालुक्यातील शिरोली विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी तुकाराम गणपत सावंत पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते चेअरमन मारुती बेंडाले यांनी आपल्या पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद रिक्त झाले होते. या पदासाठी घेण्यात आलेल्या निवडणुकीत तुकाराम सावंत यांचाच एकमेव अर्ज या पदासाठी आल्याने सावंत यांची शिरोली सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी एस.एम. बगाटे यांनी दिली. यावेळी कल्याणशिल देखणे, मंगेश सावंत, बाळासाहेब पवळे, महेंद्र शिनकर, माणिक सावंत, अनिल वाडेकर, जितेंद्र वाडेकर, संदीप दजगुडे, सोसायटीचे संचालक देवराम वाडेकर, शांताराम मलघे, मच्छिंद्र उमाप, भानुदास पवळे, वसंत वाडेकर, शंकर लोखंडे, बाळासाहेब पारघे, नारायण सावंत, मारुती बेंडाले, शोभा वाडेकर, नामदेव शिंदे, चांगुना सावंत व दत्तात्रय मुळुक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तुकाराम सावंत पाटील यांची शिरोली सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. अडीच कोटी रुपयांची उलाढाल आणि सभासद संख्या ६०० असलेल्या शिरोली सोसायटीचे नवनिर्वाचित चेअरमन तुकाराम सावंत पाटील हे शिरोली येथील आदर्श विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष आहेत.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी रामभाऊ झेंडेंची निवड

शिरूर (दैनिक संध्या) : शिरूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची नवी कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी रामदास उर्फ रामभाऊ झेंडे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. समितीच्या उपाध्यक्षपदी शरद उघडे तर सचिवपदी प्रमोद गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली. निवड प्रक्रियेदरम्यान आंबेडकरी अनुयायी व सामाजिक कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सर्वांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. नवनियुक्त अध्यक्ष रामभाऊ झेंडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, यंदाचा जयंती उत्सव शिस्तबद्ध, संघटित आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात येणार आहे. समाजातील सर्व घटकांना सहभागी करून घेऊन एकोप्याचा संदेश देणारे कार्यक्रम आयोजित केले जातील. विशेषतः युवकांना प्रेरणा देणारे तसेच समाजजागृती करणारे उपक्रम राबविण्यावर भर दिला जाणार आहे. दरम्यान, सचिव प्रमोद गायकवाड यांनी लवकरच जयंती उत्सवाच्या विविध कार्यक्रमांची सविस्तर रूपरेषा जाहीर करण्यात येईल, असे सांगितले. या नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे शिरूरमध्ये जयंती उत्सव अधिक उत्साहात व भव्य स्वरूपात साजरा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### घरे जळालेल्या कुटुंबांना नव्याने घरकुल मंजूर

चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील अहिरे ठाकरवाडी मधील आदिवासी ठाकर कुटुंबाची घरे आगीमध्ये भस्मसात झाली होती. अशा पाच कुटुंबांना शबरी आदिवासी घरकुल योजनेतून नव्याने घरकुल मंजूर करण्यात आले आहे. ज्या लाभार्थ्यांनी पूर्वी घरकुले बांधली नाहीत, त्यांची रद्द झालेली घरकुले बदलून याठिकाणी घेण्यात आली आहेत. सदर घरकुल बांधण्यासाठी उपलब्ध होणारा १.२० लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. सोपान बबन केदारी, भोराबाई कृष्णा केदारी, ज्ञानेश्वर बबन केदारी, कृष्णा पांडू केदारी व गिताबाई सावळेराम जाधव अशी लाभार्थ्यांची नावे आहेत.

### महिलेचे दागिने चोरणाऱ्यास नारायणगाव पोलिसांनी केली अटक

नारायणगाव (दैनिक संध्या) : नारायणगाव येथे रस्त्याने पायी जाणाऱ्या वृद्ध महिलेला चाकूचा धाक दाखवून जबरदस्तीने सोन्याने दागिने काढून घेणाऱ्या दोन सराईत आरोपींना नारायणगाव पोलीस स्टेशनने अटक केली आहे. जुन्नर तालुक्यातील वारूळवाडी बनकरवस्ती येथील भोराबाई कोंडीबा जाधव, (वय ७७ वर्ष) या 9 मार्च रोजी सायंकाळी 7 वाजण्याच्या सुमारास आपली दुभती जनावरे घेऊन घरी जात असताना दोन अज्ञात आरोपींनी मोटरसायकल वर येऊन त्यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून नेल्याचा प्रकार घडला होता.सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक श्री संदीप गिल्ल यांनी गुन्ह्याचा लवकरात लवकर तपास करून आरोपींना अटक करण्याच्या सूचना गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या.त्यानुसार गुन्हे शाखेचे पथक तसेच नारायणगाव पोलीस स्टेशनचे पथक यांनी घटनास्थळावरून CCTV फूटेज प्राप्त केले. मिळालेले CCTV फुटेज हे गोपनीय बातमीदारांना दाखवले असता फुटेज मधे दिसणारे आरोपी हे नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीतील रेकॉर्ड वरील आरोपी तन्मय दिलीप थोरात,(वय 20 वर्ष रा. लक्ष्मीप्रसाद सोसायटी खोडद रोड नारायणगाव तालुका जुन्नर जिल्हा पुणे)व इमरान हसन मंडल (वय 20 वर्ष, राहणार प्रेरणा हाईट्स, शेटे मळा, नारायणगाव, तालुका जुन्नर) या संशयितांना नारायणगाव येथे सापळा रचून त्यांच्याकडे सदर गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबूल. केले. त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात चोरीस गेलेला मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल, चाकू जप्त केले आहे.या आरोपींवर चोरी, घरफोडी, जबरी चोरी, मारामारी असे आठ गुन्हे दाखल आहेत. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर,सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, सहायक पोलीस निरीक्षक प्रविण सपांगे, पोलीस सब इन्स्पेक्टर जगदेव पाटील,पोलिस अंमलदार दीपक साबळे, संदीप वारे, अक्षय नवले, राजू मोमिन, मंगेश लोखंडे, सत्यम केळकर, सोमनाथ डोके, टीलेश जाधव, गोविंद केंद्रे यांनी केली आहे.



# IDBI बँक आणि डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून तीन शाळांना जलशुद्धीकरण व सौर ऊर्जेची भेट

**जुन्नर (दै. संध्या)**

ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी आय.डी.बी.आय. बँक लिमिटेड (IDBI Bank Ltd.) आणि डिसेंट फाउंडेशन, पुणे यांनी एक स्तुत्य पाऊल उचलले आहे.

बँकेच्या सी.एस.आर. (CSR) निधीतून जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ओतूर,गोळेगाव व ठाकरवाडी (वारूळवाडी ) या तीन शाळांना अत्याधुनिक 'जलशुद्धीकरण यंत्र' (RO Plant) आणि पाच किलो वॅटचे 'सोलर एनर्जी युनिट' प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे या तीनही प्रकल्पाचे उदघाट्न गुणवंत विद्यार्थ्यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांना आता शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे. दुर्गम भागातील वीज समस्येवर मात करण्यासाठी बसवण्यात आलेल्या सोलर युनिटमुळे शाळेचा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रश्न मिटला असून, संगणक शिक्षण व इतर शैक्षणिक उपक्रम राबवणे आता अधिक सुलभ होणार आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांनी या मदतीबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, शाळेतील बहुतांश विद्यार्थी हे आदिवासी व ग्रामीण भागातील आहेत. शुद्ध पाणी आणि अखंड वीज या मूलभूत गरजा पूर्ण झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यात सुधारणा होईल आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवे बळ मिळेल. IDBI बँक आणि डिसेंट फाउंडेशनचे हे सहकार्य आमच्या शाळेच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरेल."




संस्थेच्या या सामाजिक बांधिलकीबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. भविष्यातही अशाच प्रकारे ग्रामीण भागातील शाळांचे सक्षमीकरण करण्याचा मानस असल्याचे मत जितेंद्र बिडवई यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी डिसेंट फाउंडेशचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ. एफ. बी. आतार, संचालक आदिनाथ चव्हाण, शिरीष डुंबरे, मोहित ढमाले, मारुती काळे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, खरेदी विक्री संघांचे उपाध्यक्ष दीपक कोकणे, श्री लेण्याद्री देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे, सचिव शंकरराव ताम्हाणे, विश्वस्त जयवंत डोके, काशिनाथ लोखंडे, सदाशिव ताम्हाणे, विकास ताम्हाणे, वारुळवाडीचे सरपंच विनायक भुजबळ, गोळेगावचे माजी सरपंच गणेश लोखंडे, गिरीजा पतसंस्थेचे अध्यक्ष राजेश बिडवई, लेण्याद्री महीला पतसंस्थेच्या अध्यक्षा अलका माळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सचिन माळी, ग्रामपंचायत सदस्य अरविंद बिडवई, पल्लवी वाणी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष वृषभ बिडवई, राहुल रसाळे, सारथ्य फाउंडेशचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्तित होते.

## नारायणगावात लवकरच सुरु होणार मोफत डायलिसिस सेंटर

**नारायणगाव (दै. संध्या)**

"ग्रामीण भागात मूत्रपिंड विकाराचे रुग्ण वाढत आहेत. काही रुग्णांना नियमित डायलेसिस करावे लागते. जुन्नर तालुक्याच्या ग्रामीण भागात डायलिसिस सुविधा नसल्याने रुग्णांना डायलिसिस करण्यासाठी पुणे येथे जावे लागते. परंतु त्यासाठी होणारा आर्थिक खर्च, वाहतूक कोंडी त्याचबरोबर प्रवास याचा त्रास रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना सहन करावा लागत आहे.

काही कुटुंब ही डायलीसिसच्या खर्चामुळे दुर्बल झाली आहेत. याचा विचार करून मुक्ताई देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून डायलिसिस सुविधा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील पंधरा दिवसात या डायलिसिस सुविधा सुरू करण्यात येणार आहे तसेच ही सर्व सुविधा मोफत असल्याने गरीब रुग्णांना दिलासा मिळणार आहे.



तसेच अशा विविध प्रकारच्या योजना राबवण्याचा निर्धार असून समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत मदत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल.असे मत नारायणगावचे उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे यांनी व्यक्त केले.

नारायणगाव येथे रामनवमीच्या मुहूर्तावर 'ब' तीर्थक्षेत्र लाभलेल्या मुक्ताई देवस्थानच्या समाज मंदिरात मुक्ताई देवस्थान ट्रस्ट नारायणगाव व सामाजिक संस्थांच्या योगदानातून मोफत डायलिसिस सुविधा सुरु करण्यात येणार असून त्यासाठी पाच डायलीसिस मशीन उपलब्ध झाल्या आहेत.

यावेळी श्री मुक्ताई देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त योगेश पाटे, एकनाथ शेटे, संतोष खैरे, अशोक पाटे,संतोष वाजगे,भागेश्वर डेरे,ज्ञानेश्वर औटी,विलास पाटे, ॲड.राजेंद्र कोल्हे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संतोष वाजगे म्हणाले, "नारायणगाव ग्रामपंचायतीच्या वतीने कोरोना काळात नारायणगाव येथे शवदाहीनी सुरू करण्यात आली होती.आणि आता मोफत डायलीसिस सुविधा ही नारायणगाव ग्रामपंचायत उपलब्ध करून देणार असल्यामुळे ही ग्रामपंचायत लक्षवेधून घेणारी ठरणार आहे.

## महा एनजीओ फेडरेशन तर्फे पुण्यात 'नागरी समस्या निवारण केंद्र' सुरू

**कवठे येमाई (दै. संध्या)**

सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी महा एनजीओ फेडरेशनच्या वतीने पुण्यात "नागरी समस्या निवारण केंद्र" सुरू करण्यात आले असून,या उपक्रमामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

नागरिकांच्या जीवनातील विविध नागरी तसेच वैयक्तिक कायदेशीर समस्यांचे मार्गदर्शन व निराकरण करण्यासाठी हे केंद्र कार्यरत राहणार आहे. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवण्यावरही विशेष भर दिला जाणार आहे.हे केंद्र दर आठवड्याला बुधवार व शनिवार या दोन दिवशी सुरू राहणार असून, दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत नागरिकांना सेवा उपलब्ध होणार आहे. या केंद्राचे ठिकाण महा एनजीओ फेडरेशन, कार्यालय क्र. ०८, सुजय गार्डन कमर्शियल कॉम्प्लेक्स, मुकुंद नगर, पुणे – ४११०३७ असे आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.या उपक्रमामध्ये श्री. चेतन शर्मा हे समुपदेशक म्हणून मार्गदर्शन करणार असून, संस्थापक शेखर मुंडडा यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या समस्या थेट मांडून त्यावर मार्गदर्शन मिळवावे, तसेच शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महा एनजीओ फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे.

## श्रीराम नवमी निमित्त कवठे येमाई येथे हरिकीर्तनाचा भक्तिमय सोहळा संपन्न

**कवठे येमाई (दै. संध्या)**

श्रीराम नवमीच्या पावन पर्वा निमित्ताने श्री क्षेत्र कवठे येमाई येथे भक्तिमय वातावरणात हरिकीर्तनाचा सुंदर सोहळा पार पडला. यावेळी प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. गायनाचार्य प्रा.अरुण महाराज उंबरेकर (झी टॉकीज फेम) यांनी श्रीराम जन्मावर आधारित प्रभावी हरिकीर्तन सादर केले.

"राम म्हणता रामाची होईजे, पदी बैसुनी पदवी घेईने" या अभंगावर निरूपण करताना महाराजांनी भगवंताच्या अवतार कार्याचे तसेच संतांच्या कार्याचे महत्त्व अत्यंत सोप्या व प्रभावी भाषेत उलगडून सांगितले. मानव जन्माचे उद्दिष्ट काय असावे, जीवन जगताना कोणत्या गोष्टींचे पालन करावे व कोणत्या गोष्टी टाळाव्यात, याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.




भक्तीमार्गाचे महत्त्व अधोरेखित करताना नामस्मरण, पवित्र माळ धारण करणे, श्रीगुरूंचे मार्गदर्शन स्वीकारणे, तसेच जीवन निर्व्यसनी ठेवण्याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. धर्माचे पालन, आई-वडिलांची सेवा आणि सदाचारपूर्ण जीवन हेच खऱ्या अर्थाने जीवन यशस्वी करणारे घटक असल्याचा मोलाचा संदेश त्यांनी यावेळी दिला.

तसेच "स्नेह, सेवा, संयम आणि सदाचार" या चतुःसूत्रीचा अंगीकार केल्यास परमार्थ साध्य होतो, असे सांगताना "परमार्थात आवड असावी व संसारात सवड असावी; सवडीचा संसार टिकत नाही आणि आवडीचा परमार्थ सुटत नाही" हे प्रगल्भ विचार त्यांनी आपल्या चिंतनातून मांडले.यंदाचे हे हरिकीर्तनाचे २७वे वर्ष असून, प्रा. उंबरेकर महाराजांनी सलग २६ वर्षे अखंड सेवा केल्याबद्दल कवठे येमाई ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास गावातील नागरिक, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कीर्तनानंतर पाळणा, आरती व समारोप करण्यात आला. त्यानंतर सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

संपूर्ण कार्यक्रम भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला.

## राक्षेवाडी येथील हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

**चाकण (दै. संध्या)**

ज्ञानोबा तुकोबाचा जयघोष करत, टाळ मृदुंगाच्या गजरात चाकण लगतच्या राक्षेवाडी येथे मोठ्या भक्ती भावाने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता करण्यात आली. या सोहळ्याची ग्रामस्थांनी जोरदार तयारी केली होती. सप्ताह कालावधीत भाविकांनी श्रवण सुखाबरोबर महाप्रसादाचा लाभ घेतला असल्याची माहिती चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांनी दिली.

राक्षेवाडी येथे सुरू झालेल्या या अखंड हरिनाम सोहळ्यात उपनगराध्यक्षा सुवर्णा शाम राक्षे व नगरसेवक अनिल लोहकरे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी पूजन व वीणा पूजनाने या सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला, अशी माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष किरण कौटकर, यशवंत राक्षे, शाम राक्षे, श्रीकांत जाधव, कुंडलिक राक्षे, शहाजी राक्षे, निलेश राक्षे यांनी दिली.



सप्ताह कालावधीत श्रींची पूजा, काकड आरती, पारायण, प्रवचन व हरिपाठ आदी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. समाज प्रबोधनकार ह.भ.प. प्रतीक्षा कासार, पोपट राक्षे, सुरेश नाणेकर, गोपाल गीते, संदीप पवार आदींची किर्तन रुपी सेवा उत्साहात पार पडली. ह.भ.प. आकाश महाराज भोंडवे यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सोहळ्याची सांगता करण्यात आली. चाकणसह पंचक्रोशीतील भाविकांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रवण सुखाबरोबर महाप्रसादाचा लाभ घेतला असल्याचे उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेवक अनिल लोहकरे, अनिता कौटकर, किरण कौटकर, श्याम राक्षे आदींनी सांगितले. राक्षेवाडी येथील या हरिनाम सप्ताह सोहळ्याचे यंदाचे हे २९ वे वर्ष असून, या सांगता सोहळ्याची ग्रामस्थांच्या वतीने जोरदार तयारी करण्यात आली होती.

## एमआयडीसीतील पायाभूत सुविधा कोलमडल्या, रस्ते बनले मृत्यूचे सापळे

**चाकण (दै. संध्या)**

रस्त्यालगत खोदलेली गटारे, कचऱ्याच्या जंजाळात अडकलेले विद्युत जनित्र, सांडपाणी, रस्त्यावर जाळला जाणारा कचरा, जनावरांनाही चालताना लाज वाटेल असे झालेले रस्ते, विजेचा सुरू असलेला लपंडाव त्यात चाकण, एमआयडीसी व वाड्यावस्त्यांवरील रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे मृत्यूचे सापळे बनले आहेत.

चाकण एमआयडीसीतील रस्ते पूर्णपणे खड्ड्यात गेले आहेत. नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, खराबवाडी, वाघजाईनगर आदी ठिकाणच्या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. रस्त्यालगत असलेल्या ड्रेनेजला झाकणे लावलेली नसून काही ठिकाणी खोदण्यात आलेली गटारे बुजवली नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.



चाकण एमआयडीसीतील उघड्या असलेल्या गटारांमध्ये पादचारी व दुचाकी चालक पडून छोटे-मोठे अपघात झाले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून वाघजाईनगर येथील रस्त्यालगत असलेली गटारे उघडी आहेत. गटारे बुजविण्याचे वारंवार सांगून देखील संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी कसलीच दखल घेत नाहीत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी वाघजाईनगर मधील जागोजागी उखडलेला रस्ता दुरुस्ती करण्याच्या कामात हलगर्जीपणा दाखवत आहेत, असा आरोप नागरिक करत आहेत. डोळ्यावर कातडी ओढलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाघजाई नगर येथील रस्त्यालगत असलेली उघडी गटारे बुजवली नसल्याने नागरिकांनी संतापही व्यक्त केला आहे. धक्कादायक म्हणजे ठेकेदार ड्रेनेज व खोदकामाची कामे घेतात. परंतु कामे सुरू असताना सुरक्षाविषयक फलक लावत नाहीत. एखाद्याचा त्या खड्ड्यात पडून बळी गेला तरी ठेकेदाराला त्याचे काही घेणेदेणे नाही. जाणारे येणारे मरू किंवा त्यांचे हात पाय मोडू याकडे अधिकाऱ्यांचे व ठेकेदारांचे दुर्लक्ष झाले आहे.




चाकण - तळेगाव दाभाडे रस्त्यावरील खराबवाडी हद्दीतील अगदी ग्रामपंचायती नजीक असलेले विद्युत रोहित्र कचऱ्याच्या जंजाळात अडकले आहे. या ठिकाणाहून शालेय विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणात वावर सुरू असतो. येथे कचरा टाकू नका. असे फलकही त्याठिकाणी लावण्यात आले होते. हा कचरा उचलण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### रविवार झाला खास! सोनी मराठीवर 'रविवार चित्रमेळा'ची धमाकेदार सुरुवात.

मुंबई (दैनिक संध्या) : सोनी मराठी प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी नेहमीच नवनवीन कार्यक्रम घेऊन येत असते. याच परंपरेत आता सोनी मराठी घेऊन येत आहे एक खास रविवारची मेजवानी – 'रविवार चित्रमेळा'. येत्या २९ मार्चपासून, ११ वाजता प्रत्येक रविवारी दुपारचा वेळ असणार आहे खास चित्रपटप्रेमींसाठी. 'रविवार चित्रमेळा' या नव्या उपक्रमाअंतर्गत दर रविवारी प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत त्यांच्या आवडीचे, मनाला भिडणारे आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीशी नाळ जुळवणारे उत्कृष्ट मराठी चित्रपट. प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेले, कौटुंबिक मूल्य जपणारे आणि महाराष्ट्राने मनापासून स्वीकारलेले चित्रपट या मालिकेत सादर केले जाणार आहेत. प्रत्येक आठवड्याला एक नवा, वेगळा आणि आवडता चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात होणार आहे प्रेक्षकांच्या लाडक्या 'हिरकणी' या चित्रपटाने. सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक यांच्या दमदार अभिनयाने सजलेला हा चित्रपट 'रविवार चित्रमेळा'चा पहिला चित्रपट म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. म्हणूनच, तुमचा रविवार करा आणखी खास आणि रंगतदार – पाहायला विसरू नका 'रविवार चित्रमेळा', दर रविवारी दुपारी, ११ वाजता फक्त सोनी मराठीवर.



### राज्यातील पहिले गुरव पुजारी संमेलन महाराष्ट्रात; परंपरा, नव्या दृष्टिकोनाचा संगम

पुरंदर/दौंड (दैनिक संध्या) : मंदिर संस्कृतीचे उपासक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समस्त गुरव समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्याला नवा आयाम देण्यासाठी राज्यातील पहिले गुरव पुजारी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्र गुरव विकास प्रतिष्ठान आणि बोरमलनाथ देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन रविवारी आयोजित करण्यात आले आहे. राज्यातील विविध देवी-देवतांच्या मंदिरांचे संगोपन, परंपरा, संस्कृती आणि अध्यात्मिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवल शेवाळे यांनी दिली. या संमेलनात मंदिर व्यवस्थापन, संरक्षण आणि संवर्धन यासंदर्भात विशेष चर्चा होणार असून पारंपारिक संस्कार, धार्मिक आचार-विचार यावर मार्गदर्शन केले जाणार आहे. विशेषतः जुन्या मंदिरांचे जतन, जिर्णोद्धार, तसेच शासनाच्या माध्यमातून विविध योजना राबविण्याबाबत माहिती दिली जाणार आहे. याशिवाय गुरव पुजारी समाजातील महिलांसाठी रोजगार व उद्योगनिर्मितीच्या नव्या संधी निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे. मंदिर परिसर स्वच्छ, सुंदर व सुसज्ज करण्यासाठी विविध रचनात्मक प्रकल्प राबविण्याचा विचारही मांडला जाणार आहे. यासाठी शासनाच्या संबंधित विभागांकडून मदत मिळविण्याबाबत प्रयत्न होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. मंदिर संस्कृतीशी निगडित लघुउद्योग, धार्मिक साहित्य निर्मिती आणि व्यवसाय वाढीस चालना देण्यावरही संमेलनात भर दिला जाणार आहे. या संदर्भात प्रवीण राजगुरू आणि कैलास आबा शेलार यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. नवीन विचार आणि पारंपारिक संस्कार यांचा संगम साधण्यासाठी कायमस्वरूपी संस्कार शिबिरे आयोजित करण्याचाही संकल्प करण्यात आला आहे. हे संमेलन दौंड तालुका येथील बोरमलनाथ या तीर्थक्षेत्रावर रविवारी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार असून "गुरव : आज, काल आणि उद्या – संस्कार, संस्कृती आणि विकास" या विषयावर विशेष चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.



### मुस्कान बामनेने नऊवारी साडी- नथसह महाराष्ट्रीय लुकमध्ये सर्वांना थक्क केले

मुंबई (दैनिक संध्या) : सोनी सब वरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने आपल्या हृदयस्पर्शी कथाकथन आणि सांस्कृतिक क्षणांमुळे प्रेक्षकांच्या मनात खास स्थान मिळवले आहे. अलीकडील गुढीपाडव्याच्या सिक्वेन्समध्ये मालिकेत रंगतदार सणासुदीचे वातावरण दाखवले गेले, ज्यात पात्रांनी खऱ्या महाराष्ट्रीयन पद्धतीने उत्सव साजरा केला. या सिक्वेन्समध्ये शानाया ही भूमिका साकारणारी अभिनेत्री मुस्कान बामने पारंपरिक महाराष्ट्रीयन लूकमध्ये झळकली. तिने गुलाबी रंगाची नऊवारी साडी, कॉन्ट्रास्टिंग ब्लाउज आणि नथ, बांगड्या तसेच सोन्याचे सूक्ष्म दागिने परिधान केले होते. तिचा हा लूक गुढीपाडव्याच्या उत्सवी वातावरणाशी अगदी सुसंगत होता. सौम्य कुरळे केस आणि मिनिमल पण एलिगंट मेकअपमुळे तिचा लूक अधिकच आकर्षक आणि ग्रेसफुल दिसत होता. सेटवरही घरगुती उत्सवाचे वातावरण तयार करण्यात आले होते—सणासुदीची सजावट, आनंदी गडबड आणि उत्साहाने भरलेले क्षण. शॉट्सच्या दरम्यान कलाकारांनीही हा उत्सवी मूड अनुभवला, ज्यामुळे शूटिंगपेक्षा खऱ्या सणासारखा अनुभव मिळाला. लुक आणि अनुभवाबद्दल बोलताना, मुस्कान बामनेने शेअर केले, "जेव्हा मी नऊवारी साडीत तयार झाले, तेव्हा माझा मूडच बदलला. रंग इतके जिवंत होते की नथ आणि दागिने घातल्यावर मला हे फक्त कॉस्ट्यूम वाटले नाही. एका सीनदरम्यान मी घरगुती काम करत होते आणि अचानक जाणवले की सगळं किती खरं वाटत आहे.

# इंडियन म्युझिकल क्लब प्रस्तुत सुवर्ण महोत्सवी सांगीतिक मैफलीला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

मुंबई (दै. संध्या)

पिंपरी (दिनांक : २७ मार्च २०२६) इंडियन म्युझिकल क्लब प्रस्तुत 'गाता रहे मेरा दिल!' या नि:शुल्क ५० व्या सुवर्ण महोत्सवी सांगीतिक मैफलीला गुरुवार, दिनांक २६ मार्च २०२६ रोजी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील रसिक श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एल पी अर्थातच लक्ष्मीकांत प्यारेलाल या हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात यशस्वी संगीतकार जोडगोळीच्या सुरेल कारकिर्दीचा पट 'गोल्डन माईलस्टोन - लक्ष्मीकांत प्यारेलाल' या खास मैफलीतून साकार होत असताना लायन्स क्लब इंटरनॅशनलचे राजेश आगरवाल, रवी सातपुते यांच्यासह पिंपरी - चिंचवड आणि पुणे परिसरातील संगीत श्रेत्रातील विविध तंत्रज्ञ, गायक कलाकार आणि समाजातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती. याशिवाय लायन्स क्लबच्या सहयोगाच्या रौप्य महोत्सवाचे औचित्य त्यामुळे सभागृह खचून भरले होते. राखी झोपे यांची संकल्पना आणि अनिल झोपे यांच्या निर्मितीतून साकार झालेल्या या सुवर्ण महोत्सवी सांगीतिक मैफलीला शुभेच्छा देताना राजेश आगरवाल यांनी, 'इंडियन म्युझिकल क्लबने आपल्या सांगीतिक सुवर्ण महोत्सवाचे लक्ष्य गाठत असताना अवघ्या अडीच वर्षांच्या कालावधीत सुमारे १७० नवोदित आणि हौशी गायकांना व्यासपीठ




उपलब्ध करून दिले आहे. अनिल आणि राखी झोपे या दांपत्याने संगीताच्या माध्यमातून समाजात आनंद पसरविणे या संकल्पनेतून स्थापन केलेल्या या संस्थेने उत्तम कलाकार घडविण्यासोबतच समाजात कानसेन तयार केले आहेत!' असे गौरवोद्गार काढले.

इंडियन म्युझिकल क्लब अर्थातच आय. एम. सी. च्या या मैफलीत स्वप्निल शेठ, अभय चिद्री, अमित पांचाळ, हृषीकेश क्षत्रिय, ओंकार पटवर्धन, राजेश नायर, पंकज श्रीवास्तव, अनिल झोपे, नम्रता सारडा, स्वाती केसकर, श्वेता महाबळेश्वरकर, प्राची कर्णिक, अमिता जाधव, अर्चना सपकाळ, श्रीया दास, अदिती खटावकर, रश्मी माटे, गौरिता कात्रे, मनीषा जोशी, सोनल वाणी, अनया नायर या गायकांनी वाद्यवृंदासोबत अतिशय दमदारपणे लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी संगीतबद्ध केलेल्या गीतांचे प्रभावी सादरीकरण करीत श्रोत्यांची मने जिंकून घेतली. म्युझिक व्हिजनचे आशिष चौहान यांनी ध्वनिसंयोजन केले. चिंतन मोढा आणि अमन खान (की बोर्ड), हार्दिक रावळ (गिटार), असिफ खान (ऑक्टोपॅड आणि रिदम मशीन), हर्षद गनबोटे (तबला आणि ढोलक) यांनी साथसंगत केली. आय एम सीचे संजय वाघचौरे यांनी ध्वनिसंयोजन व छायाचित्रण केले. विक्रम क्रिएशन्सने दृकश्राव्यचित्रण केले. आय एम सीचे दीपक निस्ताने, धनश्री भोळे, विभावरी पाटील, निखिल वाणी आणि प्रशांत चौधरी यांनी संयोजन आणि रंगमंच व्यवस्थेची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. मनीष गोखले आणि नम्रता सारडा यांनी खुसखुशीत शैलीतून मैफलीचे निवेदन केले.

## सम्राट अशोक यांची जयंती मैत्रेय बुद्ध विहार भांडुप येथे उत्स्फूर्तपणे साजरी

मुंबई (दै. संध्या)

बहुजन हिताय सेवा मंडळ मैत्रेय बुद्ध विहार भांडुप या ठिकाणी देवानंपिय चक्रवती सम्राट अशोक यांची 2330 वी जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी बहुजन हिताय महिला सेवा मंडळाच्या अध्यक्षा आयु.सुनीता ताई कासारे यांनी सूत्रसंचालन केले.

सम्राट अशोक यांच्या बद्दल माहिती सांगण्यात आली.तसेच त्यांनी आदरणीय ओव्हाळ सर यांनी आम्हाला धम्मलिपी चे महत्त्व काय आहे आणि ती का शिकली पाहिजे याचे महत्व सांगितले आणि त्यांनी मैत्रेय बुद्ध विहार या ठिकाणी धम्मालिपी चे वर्ग सुरू करण्यात आले त्यांच्या मुळे मी आज धम्मालिपी शिकू शकली. त्यांचे त्यांनी आभार मानले. त्याच प्रमाणे आदरणीय शिवराम वाघमारे यांनीही सम्राट अशोक यांच्याबद्दल माहित सांगितली. तसेच बहुजन हिताय सेवा मंडळाचे अध्यक्ष आयु.सुरेश माने यांनी ही सम्राट अशोक यांच्या बद्दल माहिती सांगितली सम्राट अशोक यांचा इतिहास सांगताना त्यांनी सांगितले की सगळ्यात पहिली धम्मक्रांती ही तथागत गौतम बुद्ध यांनी केली त्यांच्या मुळे बौद्ध धर्म अस्तित्वात आला.

## घार हिंडे आकाशी तिचे लक्ष पिलांपाशी : महेंद्रशेठ घरत

उरण (दै. संध्या)

"माझ्या जडणघडणीत माझ्या शेलघर गावाचा मोलाचा वाटा आहे. एकेकाळचे शेलघर आणि आताचे शेलघर यात जमीन आस्मानाचा फरक आहे. आज माझे शेलघर गाव महाराष्ट्राच्या नकाशात सुनियोजित, स्वच्छ आणि बंगल्यांचे गाव म्हणून उदयास आले आहे. त्यासाठी मला खूप मेहनत घ्यावी लागली आणि अनेकांच्या विरोधालाही सामोरे जावे लागले; परंतु मी हार मानली नाही. म्हणूनच आजचे शेलघर सर्व सुविधांनी दिमाखात उभे आहे. त्यामुळे शेलघरचे नाव मोठे होण्यासाठी सर्वकाही करायला मी तयार आहे. त्यामुळेच गावातील युवकांनी माझ्याकडे २१ बाईकची प्रकाशझोतातील सामन्यांची कल्पना मांडली. त्याला मी लगेच होकार दिला. कारण आपले गाव हे गावच असते, तेथील आया-बहिणींची माया, प्रेम ही आपली शिदोरी असते. त्यामुळे त्या शिदोरीला विसरून चालणार नाही. शेवटी ग्रामस्थांच्या खांद्यावरूनच शेवटचा प्रवास आपल्याला करायचा असतो, याची मला जाणीव आहे. मी जरी आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करीत असलो तरी परदेशात असतानाही माझे गावाकडे बारीक लक्ष असते. 'घार हिंडे आकाशी तिचे लक्ष पिलांपाशी', अशी माझी अवस्था गावाबाबतीत होते. त्यामुळेच मी गावातील प्रत्येक सुख-दुःखात सहभागी होतोच. एमजी ट्राफीचे भव्य आयोजन करून तरुणांनी निश्चितच खेळाडूंना उत्तम संधी दिली आहे. त्याबद्दल सर्व तरुणांचे अभिनंदन, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत एमजी ट्राफीच्या उदघाटनप्रसंगी म्हणाले. त्यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. २७) रात्री झोकात उदघाटन झाले. यावेळी बँजो पथकाच्या तालावर आणि फटाक्यांच्या आतषबाजीत महेंद्रशेठ घरत आणि मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.


यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था आणि महेश स्पोर्टस शेलघर यांच्या वतीने शेलघरमध्ये शुक्रवारपासून एमजी ट्राफीचे आयोजन करण्यात आले आहे. २७ मार्च ते १ एप्रिलदरम्यान हे प्रकाशझोतातील टेनिस सामने होतील. सुमारे ५० संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. त्यामुळे खेळाडूंना चक्क २१ बाईक जिंकण्याची अपूर्व संधी मिळणार आहे. त्यामुळे स्पर्धेची रंगत वाढली आहे. २१ बाईकचा रणसंग्राम पाहण्यासाठी क्रिकेट रसिक मोठ्या प्रमाणात हजर होते. त्यामुळे विजेत्या संघाच्या खेळाडूंची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## Ola Electric ची '#EndICEAge' मोहीम; EV फक्त ₹४९,९९९ पासून

बंगळुरू (दै. संध्या)

Ola Electric ने '#EndICEAge' ही नवी मोहीम सुरू करत इलेक्ट्रिक वाहनांना अधिक परवडणारे बनवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. कंपनीने आपल्या Gen 3 S1 X (2kWh) आणि Roadster X (2.5kWh) ही मॉडेल्स केवळ ₹४९,९९९ पासून उपलब्ध करून दिली असून संपूर्ण पोर्टफोलिओवर ₹५०,००० पर्यंतचे फायदे जाहीर केले आहेत. ही ऑफर ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध आहे.

ग्राहकांचा विश्वास वाढवण्यासाठी कंपनीने 'सर्व्हिस ट्रस्ट गॅरंटी' सादर केली आहे. यानुसार सेवा देण्यात विलंब झाल्यास ग्राहकांना मोफत Ola कॅब व्हाउचर्स दिले जाणार आहेत. तसेच 'बायबॅक गॅरंटी' अंतर्गत वाहनाच्या भविष्यातील ६०% पर्यंत मूल्याची हमी देण्यात आली आहे. सर्व वाहनांवर ८ वर्षांची विस्तारित




वॉरंटीही देण्यात येणार आहे.

Ola Electric चे सीईओ भाविश अग्रवाल यांनी सांगितले की, वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रिक वाहनांकडे वळणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेद्वारे अधिकाधिक भारतीय ग्राहकांना EV स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा कंपनीचा उद्देश आहे. Ola च्या स्कूटर्समध्ये ३२० किमीपर्यंत रेंज, तर मोटरसायकलमध्ये ५०० किमीपर्यंत रेंज, ० ते ४० किमी वेग २.१ सेकंदात आणि १४१ किमी/तास कमाल वेग अशी प्रगत वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. MoveOS 5 मुळे सतत OTA अपडेट्सही मिळणार आहेत.

कंपनीकडून S1 Pro, S1 X आणि Roadster X अशा विविध मॉडेल्सची विस्तृत श्रेणी बाजारात उपलब्ध असून, किफायतशीर किंमत आणि प्रगत तंत्रज्ञानामुळे EV बाजारात स्पर्धा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

## 'इत्ती सी खुशी' मालिकेत भूमिका गुरंग ची एन्ट्री

मुंबई (दै. संध्या)

सोनी सबवरील इत्ती सी खुशी या मालिकेत आता एक नवा ट्विस्ट येणार आहे. लोकप्रिय अभिनेत्री भूमिका गुरूंग या मालिकेत सारा सेठी या भूमिकेत दाखल होत आहेत. सारा ही व्यक्तिरेखा ग्लॅमर, अनपेक्षित वळणं आणि भावनांचा प्रचंड वादळ घेऊन कथेत प्रवेश करते. तिच्या आगमनामुळे नातेसंबंधांमध्ये उलथापालथ होणार असून, कथानकाची दिशा पूर्णपणे बदलणार आहे.





भूमिका गुरूंग यांची व्यक्तिरेखा सारा ही एक यशस्वी हॉटेलियर असून साऊथ मुंबईतील हाय-सोसायटी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखली जाते. तिचा तीक्ष्ण मेंदू, हटके आकर्षण आणि बिनधास्त वृत्ती यामुळे ती वेगळी ठरते. स्टायलिश, विनोदी आणि अनेकदा अनपेक्षित वागणारी सारा वरकरणी आत्मविश्वासपूर्ण दिसते, पण तिच्या आत एक गुंतागुंतीचा भावनिक जग आहे. तिच्या पुनरागमनामुळे ती विराटच्या आयुष्यात पुन्हा येते, ज्याच्याशी तिचा जुना संबंध आहे. तिच्या आगमनामुळे विराट आणि अन्विता यांच्या आयुष्यात मोठा धक्का बसतो आणि त्यांच्या प्रवासाला तणावपूर्ण वळण मिळते.

भूमिका गुरूंग यांनी आपल्या भूमिकेबद्दल सांगितले, "सारा ही मी याआधी केलेल्या कोणत्याही व्यक्तिरेखेप्रमाणे नाही. तिचं अनपेक्षित वागणं मला खूप आकर्षित करतं आणि त्यामुळेच ती इतकी रोचक वाटते. वरकरणी ती ग्लॅमरस, आत्मविश्वासपूर्ण आणि नियंत्रणात असते, पण आतून ती खूप गुंतागुंतीची आणि भावनिक आहे. तिचा विचार समजून घेणं आणि ती घेतलेले निर्णय समजून घेणं हे माझ्यासाठी आव्हानात्मक आणि रोमांचक ठरलं. तिचा प्रवास तीव्र, थरारक आणि वळणांनी भरलेला आहे, आणि प्रेक्षकांनी तो अनुभवावा याची मला उत्सुकता आहे."

# कोलगेट टोटल ने केली मुंबई इंडियन्स बरोबर भागीदारी : पीक डेंटल हेल्थ सुरु ठेवण्यासाठी प्लॉट उपक्रमाची सुरुवात

मुंबई (दै. संध्या)

मौखिक आरोग्य आणि आरोग्या विषयीची आपली वचनबध्दता वाढवत कोलगेट टोटल तर्फे आज मुंबई इंडियन्स बरोबर त्यांचा डेंटल परफॉर्मन्स पार्टनर म्हणून भागीदारी केल्याची घोषणा केली असून यामुळे २०२६ च्या मौसमापूर्वी मौखिक आरोग्य हे खेळाडूंसाठी प्राथमिक असल्याचे अधोरेखित केले.

कोलगेट तर्फे प्लॉट (परफॉर्मन्स लिंक्ड ओरल टेस्ट) या सर्वसमावेशक हेल्थ स्क्रीनिंग फ्रेमवर्क ची सुरुवात करण्यात आली असून याचे डिझाईन हे खेळाडूंच्या दातांच्या आरोग्याची तपासणी आणि काळजी घेण्यासाठी करण्यात आले आहे. ही भागीदारी टीमच्या कार्यक्षमतेच्या फ्रेमवर्क मध्ये एकत्र होऊन खेळाडूंच्या मैदानातील तग धरण्याची क्षमता आणि त्यातून सावरण्यासाठी शारीरीक आरोग्य एक महत्त्वाची गोष्ट आहे हे ओळखून करण्यात आली आहे.

तोंड हे शरीराचे प्रवेशद्वार आहे. वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे असे दिसून येते की जंतू हे तुमच्या शरीरात तोंडावाटे प्रवेश करु शकतात ज्यामुळे सूज येऊन बरे होण्याची प्रक्रिया लांबते त्यामुळे खेळाडूची कार्यक्षमताही कमी होते. म्हणूनच मैदानात ज्यावेळी सर्वोत्कृष्ट कार्यक्षमतेची गरज असते अशा वेळी तोंडातील जंतूंची निर्मिती रोखणे महत्त्वाचे असते.

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आघाडीची क्लिनिशियन डॉ. मोएझ खाकियानी हे मुंबई इंडियन्सच्या लोकांच्या दातांची तपासणी ही अत्याधुनिक अशा इंट्राओरल स्कॅनिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यासह डब्ल्यूएचओ वर आधारीत मौखिक तपासण्या करुन खेळाडूंच्या मौखिक आरोग्याचा अभ्यास करुन त्यांची फिटनेस आणि कार्यक्षमते वर परिणाम




होऊ शकणाऱ्या समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला सहकार्य हे कोलगेट टोटल करणार असून याचा शक्तीशाली आणि पेटंटेड फॉर्म्युला हा जंतू निर्माण होण्यापासून तिप्पट बचाव करतो जेणेकरुन दातांच्या समस्या निर्माण होण्यास प्रतिबंध होतो. ही कोलगेटची सर्वोत्कृष्ट टुथपेस्ट प्रत्येक सर्वोत्कृष्ट लोकांसाठी आहे.

कोलगेट पामोलिव्ह इंडिया चे ईव्हीपी मार्केटिंग गुनीत जैन यांनी सांगितले " कोलगेट मध्ये आम्ही सातत्याने मौखिक आरोग्य हे लोकांच्या जीवनाच्या सुधारणेसाठी कसे महत्त्वाचे आहे याबाबत जागरुकता निर्माण करत असतो. एकीकडे खेळाडूंना योग्य झोप आणि पोषण मिळत असते अशा वेळी त्यांच्या मौखिक आरोग्यामुळे खेळात त्यांना 'हिडन एज' मिळत असतो. मुंबई इंडियन्स या अल्टीमेट परसॉनिफिकेशन ऑफ परफॉर्मन्स मुळे आम्ही ही हिडन एज मुख्य प्रवाहात आणत आहोत. याचे मूळ विज्ञानात आहे की जंतू हे तोंडावाटे शरीरात प्रवेश करतात ज्यामुळे पेशी आणि स्टॅमिना कमी होतो.

ही केवळ एक मोहिम नाही तर कार्यक्षमतेचे आयाम बदलणारी गोष्ट आहे- सुरुवातीला सर्व खेळाडूंच्या दातांची तपासणी ही अत्याधुनिक तंत्रज्ञानाने करुन कोलगेट टोटल, जी जंतू जमा होण्यापासून तिप्पट अधिक सुरक्षा देऊन दातांच्या ८ समस्यांपासून मुक्ती देते. मुंबई इंडियन्सच्या चमूला सहकार्य करतांना आम्हाला अभिमान वाटतो आणि अन्य टिम्सना सुध्दा उत्तम क्षमतेसाठी प्लॉटचा वापर करण्यासाठी आम्ही प्रोत्साहित करतो.

मुंबई इंडियन्स च्या स्पोर्ट्स सायन्स अँन्ड मेडिसिन चे प्रमुख बेन लँग्ले यांनी सांगितले " उच्च दर्जाच्या खेळात, अगदी किरकोळ सुधारणाही जय-पराजयातील फरक ठरवतात.

तोंड हे एक महत्त्वाचे प्रवेशद्वार आहे. तोंडातील जंतूंमुळे संपूर्ण शरीरात सूज निर्माण होऊ शकतो, ज्याचा थेट परिणाम स्नायू आणि हाडांच्या दुरुस्तीवर आणि हृदयाच्या कार्यक्षमतेवर होतो. कोलगेट टोटलसोबतच्या आमच्या भागीदारीमुळे आम्हाला खेळाडूंच्या आरोग्यासाठी विज्ञानावर आधारित, प्रतिबंधात्मक दृष्टिकोन कायम ठेवता येतो आणि संपूर्ण तीव्र हंगामात त्यांना सर्वोत्तम कामगिरी करण्यास मदत होते.

या भागीदारी द्वारे, कोलगेट टोटल एका साध्या विश्वासाला बळकटी देते, सर्वोत्तम कामगिरीची सुरुवात प्रतिबंधाने होते.

# देवाचे लेण असणाऱ्या सोन पिवळ्या भंडाऱ्याला भेसळीचे ग्रहण

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत खंडेरायाच्या जेजुरी नगरीत बनावट भंडाऱ्याचा अजूनही सुळसुळाट असून धार्मिक विधी आणि भाविकांच्या भावनेशी खेळण्याचा प्रकार आजही सर्रास सुरू आहे . विशेष म्हणजे अन्न व औषध भेसळ प्रशासनाकडून पूर्णतः डोळेझाक करण्यात येत आहे.खंडोबा देवाचे लेण असणाऱ्या सोन पिवळ्या भंडाराला भेसळीचे ग्रहण लागले असून या बनावट भंडारावर निर्बंध घातले पाहिजे अशी मागणी नागरिक व भाविकांकडून होत आहे.

पुरातन काळापासून कुलदैवत खंडेरायाची जेजुरी आणि भंडाराचे धार्मिक नाते आहे. भंडारा हा देवाचे लेण असून खंडेरायाच्या धार्मिक विधी, पूजा अभिषेक तळीभंडार, जागरण गोंधळ या विधीमध्ये भंडारा (हळद ) वापरला जातो.

राज्यातून येणारा भाविक हे सर्व विधी केल्यानंतर मल्हारी मार्तंडाचा जयघोष करत भंडारा खोबऱ्याची मुक्तपणे उधळण करतो , म्हणूनच येथे "देवा तुझी सोन्याची जेजुरी " अशीही म्हण प्रचलित आहे.पुरातन ग्रंथातही हळद -भंडाऱ्याचा उल्लेख हरिद्रचूर्ण असा केल्याचे दिसून येते.

मात्र गेल्या काही वर्षांपासून येथील सोनपिवळ्या भंडाऱ्याला भेसळीचे व बनावटीचे ग्रहण लागले आहे. राज्यातून येणाऱ्या भाविकांना ही बाब लक्षात येत नाही, मात्र कमी भांडवलात जास्त नफा मिळवण्याचा प्रकार काही बाहेरील व्यापाऱ्यांकडून होत आहे.गेल्या अनेक वर्षांपासून "बनावट भंडाऱ्यावर कारवाई प्रतिबंध व्हावा ही मागणी येथील स्थानिक ग्रामस्थांची प्रशासन व्यवस्थेकडे आहे .मात्र अन्न औषध भेसळ प्रशासनाचे अधिकारी येतात नमुने घेतात पुढे काहीच कारवाई होत नाही.बनावट भंडारा वितरक आणि प्रशासकीय अधिकारी यांचेच साटेलोटे असल्याची जोरदार चर्चा आहे.

बनावट भंडारा हा खाण्यायोग्य नसून कपाळावर लावल्यास त्वचेची जळजळ होणे, डोळ्यात गेल्यास डोळ्याची आग होणे, डोळे चुरचुरने लाल होणे, त्वचेवर काळे चट्टे उमटणे असे प्रकार गेली १५ वर्षांपासून येथे घडत आहेत.तर २१ डिसेंबर रोजी जेजुरी नगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर भंडारा उधळण होत असताना अचानक भंडाऱ्याचा भडका उडून सुमारे १७ जण होरपळले होते. त्यानंतर अन्न व औषध भेसळ प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी भंडारा विक्री करणाऱ्या दुकानांवर धाडसत्र करून काही नमुने आणि भंडारा वितरण करणारे चार चाकी वाहन ताब्यात घेतले होते. त्याचे पुढे काय झाले हे गुलदस्त्यात आहे. मात्र, येत्या तीन महिन्यात जत्रा यात्रा उत्सवांचे दिवस आणि लग्नसराईचा हंगाम असल्याने भाविकांची लक्षणीय गर्दी पाहता बनावट भंडारा पुन्हा







विक्रीसाठी दिसू लागला आहे. याबाबत आता भाविकांनीच जेजुरीत देवदर्शन करताना चांगला उच्च प्रतीचा खाण्यायोग्य भंडारा विकत घ्यावा, असे बोलले जाते, देवसंस्थान समिती, ग्रामस्थ खांदेकरी मानकरी मंडळाकडूनही बनावट, भेसळीच्या भंडाऱ्यावर प्रतिबंध घालावा अशी वारंवार मागणी होत आहे मात्र याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे.

जेजुरीत विक्रीसाठी वितरित होणाऱ्या काही पिशव्यांवर तर कोणताही छाप किंवा कंपनीचे नाव नाही, विशेषतः नांदेड, हैद्राबाद येथून येणाऱ्या भंडाऱ्याचा दर्जा अत्यन्त सुमार असल्याचे समजते. एकूणच सर्व प्रकार हा धार्मिक विधी आणि भाविकांच्या भावनेशी खेळण्याचा प्रकार आहे. याला प्रतिबंध घालायचा असेल तर स्थानिक नगरपालिका, अन्न व औषध भेसळ प्रशासन आणि देवसंस्थान समिती आदींकडून संयुक्तिक ठोस उपाययोजना होणे गरजेचे आहे.

अन्यथा, पुढील काळातही बनावट भंडाऱ्याचा खेळ खंडोबा असाच सर्रास सुरू राहील.

जेजुरीत आजही खाण्यायोग्य नसलेला व सौंदर्यप्रसाधनासाठी वापरण्यात येणारा बनावट भंडारा सहज उपलब्ध होत आहे मात्र, गेल्या आठवड्यात शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जेजुरीतील बनावट भंडाऱ्याचा प्रश्न उपस्थित झाला असता संबधित प्रशासन व्यवस्थेकडून कोणतीही आक्षेपार्ह आढळले नसल्याचे सांगण्यात आले तशा बातम्या प्रसारित झाल्या होत्या .त्यातून बनावट विक्रेत्यांना आणखी बळ मिळाल्याचे बोलले जात आहे.

## बनावट भंडारा कसा ओळखावा

याबाबत येथील भंडार खोबरे विक्री करणाऱ्या दुकान दारांशी संपर्क साधून माहिती घेतली असता सांगली येथून पुरवठा होणारा ९९९, संत, कमल, ब्रम्हा, साधू, सेलम, बिष्णू, गणेश या कंपनीची हळद, भंडारा आयएसओ (FSSAI Lic-No) असतो, त्याच्या शुद्धतेची हमी असते. तो देवांच्या धार्मिक विधींसह प्रसाद म्हणून भक्षण करता येतो त्याचा दर प्रती १० किलोची पिशवी १६०० ते २२०० रुपयांपर्यंत आहे. मात्र, ज्या पिशवीवर खाण्यायोग्य नाही, सौंदर्यप्रसाधनाकरीता नाही (NoN- EDIBAL, NON-COSMETIC) असे स्पष्ट छाप असलेल्या बेल भंडारा, बालाजी या कंपनीच्या प्रती १० किलोची पिशवी ११०० ते १३०० रुपयापर्यंत वितरक देतात. भाविक हा भंडारा फक्त बैलजोड्यांची मिरवणूक, शर्यती तसेच देवाच्या दारी उधळण्याकरिता पसंती देत असले तरी देवांच्या चरणी हा भंडारा अर्पण केला जातो ,प्रसादामध्ये हा मिसळला जाऊन भक्षण होतो. भाविकभक्त श्रद्धेने भक्षण करत असल्यामुळे हा अपायकारक ठरतो. सर्वात महत्वाचे हा भंडारा खाण्यायोग्य नाही फक्त उधळण करण्याकरिता आहे ही माहिती खरेदी करणाऱ्या भाविकांच्या लक्षात येत नाही, ते स्वस्त मालाला पसंती देतात. अशी माहिती त्यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ग्रामपंचायतींचे प्रलंबित मुद्रांकशुल्क अनुदान तात्काळ वितरित करा - सभापती काकडे

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : हवेली पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींना मिळणारे मुद्रांकशुल्क अनुदान अद्याप ग्रामपंचायतींना वर्ग न झाल्यामुळे तालुक्यातील गावपातळीवरील विकासकामे ठप्प आहेत. याबाबत हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांनी, पुणे जिल्हा परिषदेचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी श्री. भुषण जोशी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. मार्च अखेर जवळ येत असताना निधीअभावी विविध विकासकामे रखडली असून पाणीपुरवठा, रस्ते, लाईट, स्वच्छता, तसेच लहान-मोठ्या पायाभूत सुविधांच्या कामांवर थेट परिणाम होत आहे. गावपातळीवर नियोजित कामांना गती देणे कठीण झाले आहे. याअनुषंगाने हवेलीतील सर्वच ग्रामपंचायतींकडून, मुद्रांकशुल्क अनुदानाबाबत पंचायत समितीकडे वारंवार विचारणा केली जात आहे. राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम असलेल्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' याची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपत आहे. या अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी वेळेत पूर्ण करणे अपेक्षित आहे. परंतू निधीअभावी यातील काही बाबी प्रलंबित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर हवेली पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतींच्या खात्यावर प्रलंबित मुद्रांकशुल्क अनुदान तात्काळ वर्ग करण्यात यावे, अशी मागणी सभापती काकडे यांनी, जिल्हा परिषदेकडे केली आहे.

### शिव फाउंडेशनच्या वतीने वन्य प्राण्यांसाठी पाणवठ्यामध्ये सोडले पाणी

भिगवण (दैनिक संध्या) : इंदापूर तालुक्यातील अकोले येथील वनक्षेत्रातील पाणवठ्यामध्ये मदनवाडी येथील शिव फाउंडेशनच्या वतीने हरिण, ससे, कोल्हे, लांडगे आदी वन्य प्राण्यांसाठी पाणी सोडण्यात आले. सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढल्यामुळे प्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती. यावेळी वन्य प्राण्यांना अनेकदा रस्त्यावर अपघाताला



सामोरे जावे लागत होते. पाणवठ्यांमध्ये पाणी सोडल्यामुळे वन क्षेत्रातील प्राण्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. याबाबत बोलताना शिव फाउंडेशनचे अध्यक्ष संपत बंडगर म्हणाले, सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्यामुळे येथील प्राण्यांची पाण्यासाठी वणवण सुरू होती. ही बाब विचारात घेऊन शिव फाउंडेशनच्या वतीने अकोले, पोंधवडी व भादलवाडी येथील कृत्रिम पाणवठ्यामध्ये पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. उन्हाळ्यामध्ये गरजेनुसार हे कृत्रिम पाणवठे भरून प्राण्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न आहे. कार्यक्रमाचे संयोजन शिव फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले यावेळी, शिव फाउंडेशनचे अध्यक्ष संपत बंडगर, संतोष सवाने, औदुंबर हुलगे, अल्ताफ शेख, दिनेश मारणे, जैन संघाचे संतोष अब्बड, अकबर तांबोळी, योगेश चव्हाण आदी उपस्थित होते.

### स्व. रसिकलाल धारिवाल यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर

शिरूर (दैनिक संध्या) : जागतिक कीर्तीचे प्रसिद्ध दानशूर उद्योजक आणि शिरूरचे मा.नगराध्यक्ष स्व.रसिकलाल धारिवाल यांच्या ८७ व्या जयंती निमित्त शिरुरमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन पी.आर. धारिवाल फाऊंडेशन व प्रकाशभाऊ धारिवाल मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. रसिकलाल धारिवाल यांचा शिरुर शहराच्या योगदानात मोलाचा वाटा होता.अनेक धार्मिक,वैद्यकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले होते.गत वर्षी रक्तदान शिबिरात १५०० पेक्षा जास्त रक्तदात्यांनी सहयोग नोंदवून विक्रमी टप्पा पार केला होता.शिरूर नगर परिषद मंगल कार्यालय येथे रविवार दि.२९ मार्च २०२६ रोजी सकाळी सात ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत या वेळेत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे असे आयोजकांनी सांगितले आहे.तसेच सामाजिक भावनेतून सर्व रक्तदात्यामधून लकी ड्रॉ पद्धतीने ८७ रक्तदात्यांना सायकल वाटप करण्यात येणार आहे असे आयोजकांनी सांगितले आहे.त्यामुळे जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या शिबिरात सहभागी ह्यावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शिखर शिंगणापूर यात्रेसाठी भाविकांना सावधगिरीचे आवाहन

नाझरे सुपे (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील शिखर शिंगणापूर यात्रेसाठी कावडधारकांचे प्रस्थान सुरू असताना वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर भाविकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन माजी आमदार संजय चंद्रकांत जगताप यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात तापमानात मोठी वाढ होत असून दुपारच्या सत्रात उन्हाचा तीव्र तडाखा जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर यात्रेत सहभागी होणाऱ्या भाविकांना उष्माघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अनवाणी चालणे टाळून चप्पल वापरणे, सैलसर व हलके कपडे परिधान करणे, तसेच डोक्यावर टोपी किंवा रुमाल आणि डोळ्यांवर गॉगल वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

तसेच, शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित राखण्यासाठी पुरेसे पाणी पिणे गरजेचे असून मध, चहा, कॉफी, साखरयुक्त व कार्बोनेटेड पेयांचे सेवन टाळावे, असेही त्यांनी नमूद केले. आवश्यकतेनुसार विश्रांती घेऊनच पुढील प्रवास करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.



वाढत्या उष्णतेमुळे आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शिखर शिंगणापूर यात्रेस जाणाऱ्या प्रत्येक भाविकाने योग्य ती काळजी घेऊनच यात्रा करावी.
- माजी आमदार संजय जगताप, पुरंदर हवेली




# कवठे येमाईत एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ; किशोरींच्या आरोग्य सुरक्षेला प्राधान्य

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे गर्भाशय मुखाच्या कॅन्सरपासून संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या एचपीव्ही प्रतिबंधक लसीकरण मोहिमेचा शुभारंभ आयुष्यमान आरोग्य मंदिर येथे उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील किशोरींमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास मोठी मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्या कांचनताई राजेंद्र सांडभोर, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग भोर, माजी उपसरपंच विठ्ठल मुंजाळ, नवनाथ सांडभोर, लक्ष्मणनाना मुखेकर, विस्तार अधिकारी संभाजीराव कोकडे, तालुका आरोग्य पर्यवेक्षक तुषारजी कुंभार यांच्यासह आरोग्य विभागातील विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच डॉ. दिक्षा मॅडम, डॉ. बाविस्कर सर, डॉ. महाजन सर, आरोग्य निरीक्षक बलभीम पठारे, संदीप कुंजीर, आरोग्य सहायिका पुष्पा बर्डे, सुनिता जगदाळे, आरोग्य सेवक विनायक गोसावी, अमोल जाधव, आरोग्य सेविका विद्या लोखंडे, तेजवंती नैताम यांच्यासह संपूर्ण आरोग्य पथकाने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला. यावेळी विद्याधाम प्रशाला कानूर मेसाई व न्यू इंग्लिश स्कूल, कवठे येथील १४ ते १५ वयोगटातील मुलींना एचपीव्ही लसीचे डोस देण्यात आले. तज्ज्ञांनी या लसीकरणाचे महत्त्व समजावून सांगताना, भविष्यात गर्भाशय मुखाच्या कॅन्सरचा धोका कमी करण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी असल्याचे स्पष्ट केले.कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी पालकांना आवाहन केले की, आपल्या मुलींना वेळेवर लसीकरण करून त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवावे.

ग्रामीण भागात अशा आरोग्य मोहिमांमुळे महिलांच्या आरोग्याबाबत सकारात्मक बदल घडून येतील, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.या उपक्रमामुळे कवठे येमाई परिसरात आरोग्याबाबत जागरूकते चे नवे पाऊल पडले असून, भविष्यात अशा मोहिमा अधिक व्यापक प्रमाणात राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# थकीत मालमत्ता धारकांसाठी राजगुरुनगर नगरपरिषदेची "अभय योजना", अंतिम मुदत ३१ मार्च

राजगुरुनगर (दै. संध्या)

थकीत मालमत्ता धारकांना पन्नास टक्के शास्ती कर माफ करण्याचा निर्णय राजगुरुनगर नगरपरिषदेने घेतला आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार तसेच पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या १० मार्च २०२६ रोजीच्या आदेशान्वये नगरपरिषदेकडून 'अभय योजना' राबविण्यात येत असल्याची माहिती मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी दिली.

या योजनेअंतर्गत १९ मे २०२५ पर्यंत मालमत्ता करावरील थकीत शास्ती (दंडात्मक व्याज) असलेल्या सर्व मिळकतधारकांना ५० टक्के शास्ती माफी देण्यात येणार आहे. यासाठी संबंधितांनी मूळ मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम तसेच ५० टक्के दंडात्मक व्याज भरून,

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगर अधिनियम १९६५ च्या कलम १५० (क) नुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे, असे गरकळ यांनी स्पष्ट केले. ही अभय योजना केवळ एकदाच, म्हणजेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापुरतीच लागू असून तिची अंतिम मुदत ३१ मार्च २०२६ आहे.

नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ व उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर यांनी थकबाकीदार नागरिकांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. 'नागरिकांनी तातडीने नगरपरिषद

कार्यालयात संपर्क साधून ५० टक्के शास्ती माफीसाठी अर्ज करावा,' असे त्यांनी नमूद केले.

कर संकलन विभागात विहित नमुन्यात अर्ज उपलब्ध असून त्याच नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जासोबत सन २०२५-२६ या वर्षाचा मालमत्ता कर पूर्ण भरल्याची पावती (५० टक्के शास्ती वगळून) छायाप्रत जोडणे बंधनकारक असल्याचे कर निरीक्षक जगदीश नागलोत यांनी सांगितले.

या योजनेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले असून, अधिक माहितीसाठी राजगुरुनगर नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डॉ. डोळे यांनी केले बेबी गवळी यांचे जीवन प्रकाशमय

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील 14 नंबर येथे राहणारे बेबी राजकुमार गवळी यांचा जन्मजात उजवा डोळा निकामी होता आणि कोरोना काळात डाव्या डोळ्याचा मागील पडदा देखील सरकला होता. या महिलेची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्या महिलेवर पद्मश्री डॉ.मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशन तर्फे व्हिट्रेक्टॉमी या अत्याधुनिक तंत्रज्ञानातून मोफत शस्त्रक्रिया करून तिचे जीवन हे पुन्हा प्रकाशमय करण्यात आले.

बेबी राजकुमार गवळी यांचा उजवा डोळा जन्मजात निकामी होता. आणि कोरोना काळात डाव्या डोळ्याचीही दृष्टी गेली होती. त्यांची पुढील उपचार घेण्यासाठी आर्थिक परिस्थिती नसल्याने त्या पूर्णपणे खचून गेल्या होत्या. त्यानंतर त्यांची बेल्हे येथील मोफत शिबिरात तपासणी झाल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉ. संदीप डोळे व व डॉ. स्मिता डोळे यांनी त्यांना आधार देत सर्व तपासण्या मोफत करून पुणे येथील नेत्रतज्ञ डॉ. जीवन काळे यांनी व्हिट्रेक्टॉमी यंत्रणेद्वारे त्यांच्या डोळ्याच्या मागील पडद्यावर यशस्वी शस्त्रक्रिया केली.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त नियोजन बैठक संपन्न

पुणे (दै. संध्या)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त आवश्यक नियोजनाबाबत पुणे महापौर दालनात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत मिरवणूक मार्गाचे वाहतूक नियोजन, कायदा व सुव्यवस्था, अनुयायांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्य पथक व कार्डियाक ॲम्ब्युलन्सची नियुक्ती, विद्युत रोषणाई, अग्निशमन व्यवस्था, महापालिका सुरक्षा, मोबाईल टॉयलेट, मंडप, स्टेज, टेबल-खुर्ची तसेच मदत कक्ष उभारणी यांसंदर्भात सविस्तर



चर्चा करण्यात आली.

याशिवाय सम्राट अशोक स्तंभाची देखभाल व दुरुस्ती, तसेच दादासाहेब गायकवाड यांच्या पुतळ्याची रंगरंगोटी आणि डी.पी. रोड, औंध येथील डॉ. आंबेडकर पुतळ्याचे नूतनीकरण करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या नियोजनानुसार ३० मार्च रोजी विश्रांतवाडी येथे आणि ३१ मार्च रोजी पुणे स्टेशन परिसरातील बंडगार्डन पोलिस स्टेशन येथे पुढील बैठका आयोजित करण्यात येणार आहेत.

या बैठकीत महापौर सौ. मंजुषा नागपूरे व उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी प्रशासनाला सर्व नियोजन काटेकोरपणे अंमलात आणण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीस निलेश आल्हाट, सभासद, पुणे महानगरपालिका, ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष), हिम्मत जाधव, डी.सी.पी. ट्राफिक, पुणे, संतोष पांढरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक (बंडगार्डन, पुणे), श्रीमती संगीता देसाडला, कार्यकारी अभियंता, भवन विभाग, धनंजय पिंगळे, ट्राफिक विभाग, श्रीमती आशा राऊत, उपायुक्त, सुरक्षा विभाग, माधव जगताप, उपायुक्त झोन क्र.०१ , रवी पवार उपायुक्त कर आकारणी कर संकलन विभाग, डॉ. अशोक घोरपडे सह महापलिका आयुक्त उद्यान विभाग, सोमनाथ बनकर, उपायुक्त अतिक्रमण विभाग, अविनाश सकपाळ, उपायुक्त घनकचरा विभाग, वसुंधरा बारवे उपायुक्त शिक्षण विभाग, बिपीन शिंदे पुणे मुख्य अभियंता भवन विभाग, नंदकिशोर जगताप मुख्य अभियंता पाणीपुरवठा विभाग, हांडे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीमती संगीता जाधव, पोलिस निरीक्षक येरवडा वाहतूक श्रीमती निशिगंधा शिंगे, येरवडा वाहतूक विभाग, संदीप माढाले, फरासखाना विभाग, कुणाल धुमाळ, रमेश शेळके, राकेश विटकर सुरक्षा अधिकारी, प्रमोद उंडे कार्यकारी अभियंता विद्युत विभाग, सुनिल यादव कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग, सहायक आरोग्य अधिकारी डॉ.सुनिल आंधळे, श्रीमती प्रज्ञा पवार सहा.महापालिका आयुक्त विजय भिलारे सहायक विभागीय अधिकारी अग्निशामक विभाग इत्यादी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.